रायगड, बुधवार दि. ३१ मे २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

सावरसई परिसरात अनधिकृत बांधकामावर कारवाईस टाळाटाळ

पान ३ वर

पाहिजेत

संस्थेच्या विविध प्रकल्पांचे मॉनिटरिंग व व्यवस्थापन करण्यासाठी अनुभवी MBA/MSW किंवा कोणत्याही शाखेचा पदवीधर परंतू आस्थापनाचा दांडगा अनुभव असणाऱ्या उमेदवाराची संस्थेत आवश्यक्ता आहे. उमेदवाराचे वय ४० वर्षांचे आतील असावे. कामाच्या अनुभवानुसार मानधनाचा विचार करण्यात येईल. उमेदवाराने खालील ईमेलवर अर्ज करावेत. अर्जात अपेक्षित मानधनाची नोंद करावी. अर्ज ८ जून पर्यंत करावेत. उमेदवारांना ई-मेलद्वारे मुलाखतीस बोलवण्यात येईल.

महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट
msvtrecrutment@gmail.com

वेधक

बोरघाटात रिक्षेला अपघात

खोपोली : कन्येचा विवाह सोहळा आटोपून बीड ते नवी मुंबई असा रिक्षेने प्रवास करणाऱ्या नवी मुंबईतील एका कुटुंबावर अपघाताचा घाला झाला. बोरघाटात भरधाव रिक्षा पलटी झाल्याने त्यात महिला गंभीर जखमी झाली.तर दोन लहान मुली सुदैवाने बचावल्या.ही दुर्घटना शिंग्रोबा मंदिरानजीक घडली. बीड जिल्ह्यातील वैजनाथ येथील विष्णू राम गुट्टे ,सुरेखा विष्णू गुट्टे हे कुटुंब नवी मुंबई येथे वास्तव्य करुन आहे. बोरघाटातून उतरत असताना हा अपघात घडला.

खा.बाळू धानोरकर पंचत्वात विलीन

चंद्रपूर : चंद्रपूरचे काँग्रेस खासदार सुरेश उर्फ बाळू धानोरकर (४८) यांच्या पार्थिवावर मंगळवारी (३० मे) वरोरा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. मंगळवारी पहाटे त्यांचे नवी दिल्लीतील वेदांता हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान निधन झाले. एअर ॲम्ब्युलन्सद्वारे त्यांचे पार्थिव वरोरा येथील निवासस्थानी आणण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी वरोराच्या आमदार प्रतिभा धानोरकर, दोन मुले, आई असा मोठा परिवार आहे.

नमो शेतकरी महासन्मान योजना

मुंबई : राज्यात नमो शेतकरी महासन्मान निधी योजना लागू करण्यात येणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. यंदाच्या बजेटमध्ये या योजनेची घोषणा करण्यात आली होती, आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्याला मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत वर्षाला शेतकऱ्यांच्या खात्यावर केंद्राच्या सहा हजार रुपयांसह राज्य सरकारचे सहा हजार रुपये जमा होतील.

संभाजी ब्रिगेडसमवेत ठाकरे गटाची मोट

मुंबई : शिवसेना (ठाकरे गट) आणि संभाजी ब्रिगेड यांनी आगामी काळात होणाऱ्या निवडणुकीची मोर्चेबाधणी सुरु केली आहे.या पार्श्वभूमीवर दोन्ही पक्षांच्या नेतेमंडळींची मंगळवारी शिवसेना भवन येथे बैठक पार पडली. ठाकरे गट आणि संभाजी ब्रिगेडच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची लवकर बैठक होणार आहे. तसेच, ऑगस्ट महिन्यात ठाकरे गट आणि संभाजी ब्रिगेडचा संयुक्तिक मेळावा होणार असल्याची माहिती खासदार अरविंद सावंत यांनी दिली.

गंगेच्या काठी अश्रूंची दाटी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय कुस्तीगीर महासंघाचे अध्यक्ष खा.ब्रिजभूषणसिंग यांच्याविरोधात सुरु असलेल्या कुस्तीपटूंच्या आंदोलनाला मंगळवारी गंभीर वळण लागले. ब्रिजभूषण यांना अटक करण्यात होत असलेल्या दिरंगाईच्या निषेधार्थ आंदोलनकर्त्यांनी विविध स्पर्धांमध्ये मिळविलेली पदके हरिद्वार येथील गंगेत विसर्जित करण्याचा निर्णय घेतला. त्यावरुन गंगातिरी कमालीचे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र या खेळाडूंची समजूत काढत ही पदके ताब्यात घेण्यात आली आहेत. पुढील पाच दिवसात ब्रिजभूषण यांना अटक न झाल्यास आपली पदके गंगेत विसर्जित करणार, असा निर्वाणीचा इशाराही यावेळी आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

साक्षी मलिक, विनेश फोगाट, बजरंग पुनिया हे ऑलिम्पिक विजेते खेळाडू हरिद्वार येथील गंगा नदीच्या किनाऱ्यावर दाखल झाले होते.त्यांना पाठिंबा देण्यासाठी गंगातिरी चाहत्यानी मोठी गर्दीही केली होती. या सर्वांनी आपल्या सोबत मिळालेली पदकेही आणली होती. मोठ्या कष्टानं आणि जीवाचं रान करुन मिळवलेली ही पदकं नदीच्या पाण्यात विसर्जित करणं देखील त्यांना कठीण झाले. ही पदक आपल्या छातीशी कवटाळून हे खेळाडू बसले होते. जणू एखाद्या सांत्वन सभेसारखं या ठिकाणी वातावरण तयार झालं होते.

आंदोलनकर्त्यांची हरीद्वारला घोषणा

'ब्रिजभूषणला पाच दिवसात अटक करा; अन्यथा पदकांचे गंगेत विसर्जन'

शेतकरी नेत्यांची मध्यस्थी

या आंदोलनकर्त्या कुस्तीपटूंची शेतकरी नेत्यांनी कुस्तीपटूंची समजूत काढल्यानंतर गंगा तिरावरुन सर्व कुस्तीपटू मागे परतले. कुस्तीपटूंनी शेतकरी नेते नरेश टिकैत यांच्याकडे सर्व पदक सोपवले आहेत. केंद्र सरकारचा निषेध म्हणून कुस्तीपटूंनी मेहनतीने कमावलेली सर्व पदक गंगेत विसर्जित करण्याचा निर्णय घेतला होता. सर्व कुस्तीपटू विविध पदकांनी भरलेल्या बॅगा घेऊन हरिद्वार येथे गंगा किनाऱ्यावर जमले होते. परंतु त्यानंतर शेतकरी नेत्यांनी कुस्तीपटूंना थांबवण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या या प्रयत्नाला यश आलं आणि कुस्तीपटूंनी त्यांचा निर्णय मागे घेतला.

श्रीगंगा सभेचा विरोध

गंगा हे श्रीक्षेत्र आहे आणि त्याला राजकारणाचा आखाडा बनवू नका, असं आवाहन श्रीगंगा सभेचे अध्यक्ष नितीन गौतम यांनी केलं. सर्व खेळ हे अमर असतात आणि पदकांना अस्थी समजून विसर्जित करू नका, असंही पुढे नितीन गौतम यांनी म्हटलं होतं. गंगेच्या तिरावर पूजा केली तरी चालेल, पण असे प्रकार करु नका, असं त्यांनी म्हटलं. गंगेत पदकं प्रवाहित करण्याच्या कुस्तीपटूंच्या निर्णयाला श्रीगंगा सभेने विरोध केला होता.

२८ मे रोजी कुस्तीपटूंनी दिल्ली पोलीस प्रशासनाकडून उद्विग्न वागणूक मिळाली आणि या प्रकाराचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाले होते. आम्हाला देशात इतकी वाईट वागणूक मिळत असेल, तर या पदकांचा तरी काय उपयोग? असा प्रश्न विचारत त्यांनी सर्व पदकं गंगेत विसर्जित करण्याचा निर्णय घेतला होता.

रेवदंड्यातील सावित्रीच्या लेकींना

मोफत सायकलींचा मिळाला आधार

शेकापच्या चित्रलेखा पाटील यांचा उपक्रम

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाच्या महिला आघाडीप्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या पुढाकाराने सीएफटीआय या संस्थेच्या माध्यमातून रेवदंडा, पालव परिसरातील शंभरहून अधिक मुलींना सायकलचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम रेवदंडा येथील भंडारी सभागृह येथे चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवार (दि. ३०) रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. या सायकली वाटपामुळे रेवदंड्यातील सावित्रीच्या लेकींना आधार मिळाल्याने मुलींसह त्यांच्या पालकांच्या चेहऱ्यावर वेगळ्या हास्य फुलले असल्याचे दिसून आले.

ग्रामीण भागातील मुली शिकल्या पाहिजेत. त्यांच्या शिक्षणाची दारे खुली झाली पाहिजेत. हा उद्देश समोर ठेवून चित्रलेखा पाटील यांनी शासनाच्या एक पाऊल पुढे जात गरीब व गरजू मुलींना सायकल वाटप करण्याचा उपक्रम गेल्या अनेक वर्षापासून हाती घेतला आहे. या उपक्रमांमुळे गावे, वाड्यांमधील अनेक गरीब, गरजू मुलींना शिक्षण घेण्यासाठी एक वेगळे बळ मिळत आहे. त्याचाच एक भाग म्हणून रेवदंडयामधील शाळकरी मुलींसाठी मोफत सायकल वाटप करण्याचा नाविन्य उपक्रम मंगळवारी घेण्यात आला. रेवदंडा व पालवमधील सुमारे शंभरहून अधिक मुलींना चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते सायकल वाटप करण्यात आली. यावेळी अलिबाग पंचायत समितीच्या माजी सभापती सरोज वरसोलकर,

पान २ वर

मुलींच्या शिक्षणाला गती

गरीबांशी बांधिलकी ठेवून शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ.जयंत पाटील यांनी काम केले आहे. शासनाच्या निधीचा वापर गावांच्या विकासासाठी कसा होईल याकडे कायमच लक्ष दिले आहे. शासनाच्या वेगवेगळ्या योजना लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला आहे. आमदार जयंत पाटील यांच्याकडून प्रेरणा घेत समाजातील गरीब गरजूंसाठी काम करण्यास सुरुवात केली आहे. शाळेतील मुली शिकल्या पाहिजेत. त्यांच्या शिक्षणासाठी अडथळे येऊ नये यासाठी मुलींसाठी सायकल वाटप केले आहेत. वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्यांना चष्मा घेणे परवडत नाही. त्यामुळे नेत्र तपासणीच्या उपक्रमातून गरजूंना मोफत चष्मे वाटपाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. सायकल गती देणारे एक वाहन आहे. सायकलमुळे मुलींच्या शिक्षणाला गती मिळणार आहे, असे शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी सांगितले.

जुन्या सोन्याच्या आमिषाने फसवणूक

। अलिबाग । विशेष प्रतिनीधी ।

शेतामध्ये नांगरणी करताना जुने सोनं मिळाले असल्याचे सांगून ते सोनं बाजारभावाच्या अर्ध्या किमतीत विकण्याचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या टोळीला जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाला यश आले आहे.

शिवाजी विठ्ठल मोहित (नांदेड), वशिकला कांतीलाल पवार, उस्मानाबाद, अनिता रजनीकांत भोसले, अहमदनगर यांना ताब्यात घेण्यात आले आहे. तर यातील आरोपी कांतीलाल दत्तू पवार, परांडा, जि. उस्मानाबाद याचा पोलीस शोध घेत आहेत. नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत घडलेल्या या गुन्ह्यांचा समांतर तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून सुरु होता. तपासादरम्यान पथकातील पोलिस हवालदार चव्हाण यांनी यातील आरोपीबाबत तांत्रिक विश्लेषण करून त्याआधारे आरोपी अहमदनगर आणि परांडा येथे असल्याचे माहित केले.

पान २ वर

'रेंट ए बाईक'चे करायचे काय?

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग शहरामध्ये रेंट ए -बाईक अर्थात दुचाकी भाड्याने देण्याचा व्यवसाय अनेक व्यवसाय चालू असला तरी तो कायदेशीर आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. परंतु हा व्यवसाय बेकायदेशीर असल्याचे उपप्रादेशिक परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे. मात्र काही अटी शर्ती लागू करून या व्यवसायाला मान्यता मिळाल्यास पर्यटन वाढीसाठी फायदेशीर ठरू शकते असा व्यवसायिकांचा दावा आहे.

रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने या ठिकाणी ओघ प्रचंड वाढत आहे. परंतु खासगी वाहनांचे भाडे अनेक पर्यटकांना न परवडण्यासारखे आहे. रायगड जिल्ह्यातील अनेक भागात विशेष करून अलिबाग, रेवदंडा, मांडवा, मुरुड, काशीद अशा अनेक पर्यटनस्थळी पोहचण्यासाठी कमी दरात भाड्याने दुचाकी वाहन देण्याची क्रेझ गेल्या सहा वर्षापासून सुरु आहे. विशेष करुन तरुण मुला,मुलींमध्ये याचे अधिक आकर्षण आहे.



काही हॉटेलमध्ये तर काही ठिकाणी दुचाकी भाड्याने देण्याचे स्टॉल सुरु झाले आहे. शनिवार व रविवारी या दुचाकी वाहनांना पर्यटकांकडून चांगली मागणी वाढत आहेत. दिवसभरात पाचशे रुपये भाडयाने दुचाकी दिल्या जात आहे. या व्यवसायातून अनेकांना रोजगाराचे साधन खुले झाले आहे. मात्र दुचाकी भाड्याने देण्याचा व्यवसायामुळे रिक्षावाल्यांच्या धंद्यावर मोठा परिणाम झाला आहे.

पान २ वर

> दुचाकी भाड्याने देण्याचा व्यवसाय गेल्या २० वर्षापासून जिल्ह्यात सुरु आहे. दुचाकी भाड्याने मिळत असल्याने पर्यटकांचा त्याचा चांगला फायदा होत आहे. यातून अनेकांना रोजगार मिळत आहे. पर्यटन वाढीला चालना देण्यासाठी हा व्यवसाय चांगला आहे. त्यामुळे प्रशासनाने याकडे लक्ष देऊन मान्यता द्यावी.
>
> - व्यावसायिक
> नाव न सांगण्याच्या अटीवरून

सुशोभिकरण झालं अन् तलावाचं रुप पालटलंय

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

पर्यावरण संतुलन व जैवविविधतेत तलाव, सरोवर व जलाशयांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे त्यांचे जतन करण्यासाठी शासनाने सरोवर संवर्धन अभियान सुरू केले आहे. या अभियान अंतर्गत रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून डिसेंबर २०२२ पर्यंत ७७ तर १ जानेवारी ते ३० मे २०२३ पर्यंत ७६ अशा एकूण १५३ तलावांमधील गाळ काढणे, सुशोभीकरण करणे, बळकटीकरण किंवा पुर्नजीवित करणे अशी कामे पूर्ण करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील १५३ तलावांचे संवर्धन

तालुकावार तलाव

रायगड जिल्ह्यातील अमृत सरोवर अभियानांतर्गत अलिबाग तालुक्यातील ११ तलावांचे संवर्धन करण्यात आले. तर कर्जत १०, खालापूर २०, महाड ११, माणगाव १४, म्हसळा ७, मुरुड ९, पनवेल १३, पेण ८, पोलादपूर १०, रोहा १३, श्रीवर्धन ५, सुधागड १०, तळा २, उरण १० तलावांचे संवर्धन करण्यात आले आहे.

सरोवर संवर्धन अभियान अंतर्गत एक एकर क्षेत्राचे नवीन तलाव निर्मिती करणे, तसेच एक एकर क्षेत्रात अस्तित्वात असणार्या तलावातील गाळ काढणे, सुशोभीकरण करणे, बळकटीकरण किंवा पुर्जिनवित करणे यासह तलाव परिसरात वृक्ष लागवड, शौचालय व्यवस्था ही कामे करण्यात आली आहेत. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून तालुकास्तरावरुन अस्तित्वात असणारे १७८ तलावांची अमृत सरोवर पोर्टलवर नोंद करण्यात आली असून, ग्रामस्थांच्या सहभागातून ग्रामपंचायत

पान २ वर

अल्पवयीन मुलावर अत्याचार

आरोपीला सक्तमजुरी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यातील अल्पवयीन मुलावर अत्याचार करण्यात आला होता. या गुन्ह्यातील आरोपीला दोषी ठरवत विशेष न्यायाधीश शाईदा शेख यांनी ३६ वर्षीय आरोपीला दहा वर्षे सक्त मजुरीची शिक्षा सुनावली. हा महत्वपुर्ण निकाल पनवेल येथील न्यायालयात ३० मे रोजी देण्यात आला.

देविदास महादेव मोकल असे या आरोपीचे नाव आहे. हा आरोपी खालापूर तालुक्यातील खोपोली येथील साईबाबा नगर परिसरात राहणार आहे. तसेच पिडीत मुलगा देखील त्याचठिकाणचा रहिवासी आहे. त्याने त्या मुलावर अनैर्सिग अत्याचार केले.याबाबत मुलाने आपल्या घरातील मंडळींनी ही माहिती दिली. त्यांनी तातडीने खोपोली पोलीस ठाणे गाठले. अत्याचार करणाऱ्या देविदास मोकल याच्याविरोधात तक्रार केली. घटनेचे

पान २ वर

बोटी किनारी लावण्याची लगबग

मच्छिमारांना लागले पावसाळ्याचे वेध

। अलिबाग । प्रतिनिधी ।

दररोज बदलणाऱ्या हवामानाचा अंदाज घेत रायगडातील मच्छिमारांना आता वरुणराजा कधीही येऊ शकतो याचा अंदाज येऊ लागला आहे. त्या पार्श्वभूमीवर कोळीवाड्यात मच्छिमारी बोटी किनाऱ्यावर लावण्याची लगबग सुरु झालेली आहे. या बोटी किनाऱ्यावर आणताना मच्छिमारांकडून होणाऱ्या हय्या, हय्याचा आवाज आता सर्वत्र घुमू

पान २ वर

(छायाचित्र : श्रेया फोटो)

> पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मच्छिमारांची लगबग सुरु झाली आहे. दर्यात खोल समुद्रात जाणाऱ्या बोटी पावसाळ्यात किनाऱ्यावर नांगरुन ठेवण्याचे काम सुरु आहे.अजून आठवडाभर तरी ही प्रक्रिया सुरु राहिल.
>
> - प्रविण तांडेल, सचिव, जिल्हा कोळी समाज संघ

रिक्षा, विक्रम, मिनिडोअरच्या 'निवृत्ती वया'मध्ये वाढ

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगडातील विक्रम, मिनिडोअर, तीन चाकी, सहा आसनी रिक्षांच्या वयोमर्यादा वाढीला सरकारने मान्यता दिल्याचे उप प्रादेशीक अधिकारी महेश देवकाते यांनी जाहीर केले.

मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीमध्ये दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन प्राधिकरण रायगड यांच्या पार पडलेल्या बैठकीनुसार रायगड जिल्हा प्रादेशिक प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात नोंदणी झालेल्या विक्रम, मिनिडोअर तीनचाकी, सहा आसनी या वाहनांस पर्यायी बदली वाहन म्हणून बाजारात उपलब्ध असलेल्या इड-तख मानांकनातील पेट्रोल, सीएनजी या इंधनावर चालणाऱ्या तीनचाकी-सहाआसनी प्रवासी वाहनास बदली वाहन म्हणून नोंदणी करण्यास तत्वत:मान्यता दिली असल्याची माहिती उप प्रादेशीक अधिकारी महेश देवकाते यांनी दिली आहे.

जिल्हा प्रादेशिक प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात नोंदणी झालेल्या (विक्रम, मिनिडोअर तीनचाकी, सहा आसनी) या प्रवासी वाहनांची वयोमर्यादा सरसकट २ वर्षे म्हणजेच २७ वर्षे तसेच तीन चाकी-तीनआसनी ऑटोरिक्षा या प्रवासी वाहनांची वयोमर्यादा सरसकट २ वर्षे म्हणजेच २२ वर्षे करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने प्रादेशिक परिवहन प्राधिकरण,रायगड यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व तालुक्यांमधील (पेण व अलिबाग वगळून) वाहनधारकांनी याची नोंद घ्यावी, असे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पेण महेश देवकाते यांनी कळविले आहे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३१ मे

१) श्रीम. सीमंतिनी श्रीकृष्ण पाटील,
दत्तमंदिराजवळ, विद्यानगर, अलिबाग
३१ मे १९५३

२) श्री. शशिकांत गोपीनाथ म्हात्रे
मारुती मंदिराजवळ, मु.थळ-पालथी, पो.थळ, अलिबाग
३१ मे१९५६

आदिवासी महिलेची फसवणूक

। पेण । प्रतिनिधी ।

पेण राजू पोटे मार्गावर मोठ्या प्रमाणावर आदिवासी महिला आंबे विक्री करण्यासाठी रस्त्याच्या कडेला बसत असतात. आज सकाळी ८:३० च्या सुमारास एका सुशिक्षित तरूणाने ५०० रूपयाची नकली नोट देऊन आदिवासी भगिनीकडून २ डझन आंबे विकत घेतले. त्या आदिवासी भगिनीकडून ३०० रू.परत घेतले आणि आपल्या सफेद रंगाच्या ऍक्टीव्हा नं. ५४४१ वरून पळून गेला. याबाबतची तक्रार दाखल होताच पोलिस निरीक्षक देवेंद्र पोल यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सीसीटीव्हीचे फुटेज तपासले. अशिक्षित महिलांना फसवणे ही योग्य बाब नसून याबाबत समाज माध्यमांवर मोठया प्रमाणात या चिटर तरूणावर ट्रोल केले जात आहे.

चौथ्या बंदराचा घारापुरीला धोका

मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याची मागणी

। उरण । वार्ताहर ।

चौथ्या बंदकासाठी करण्यात येत असलेल्या भरावाचा घारापुरीला धोका निर्माण होणार आहे.या भरावामुळे मच्छिमारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे.या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत शिष्टमंडळाने जेएनपीएच्या नवनियुक्त सचिव मनिषा जाधव यांची भेट घेऊन प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांचे निवेदन यावेळी देण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने प्रकल्पग्रस्तांना नुकसान भरपाई मिळण्याची मागणी करण्यात आली आहे.

चौथ्या बंदरासाठी समुद्रात मातीच्या भरावाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. यामुळे प्रामुख्याने जागतिक कीर्तीचा वारसा लाभलेला पर्यटनस्थळ म्हणून समाजल्या जाणाऱ्या घारापुरी ग्रामपंचायत मधील ग्रामस्थांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. यातून सामंजस्याने मार्ग काढण्यासाठी घारापुरी ग्रामपंचायत शिष्टमंडळाने आज जेएनपीए सेक्रेटरी मनीषा जाधव यांची भेट घेऊन समस्या मांडल्या.

समुद्रात होत असलेल्या मातीच्या भरावामुळे तसेच समुद्राची खोली वाढविल्याने पाण्याचा प्रवाह वाढला आहे. त्यामुळे मासेमारी करणाऱ्यांचे नुकसान होत आहे. तसेच घारापुरी ते मोरा प्रवास जीवघेणा ठरत आहे. प्रवासासाठी आदींच्या तुलनेने अधिक वेळ लागत आहे. यावर वेळीच उपाययोजना केली नाहीतर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

घारापुरी बेटावर सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढत चालली आहे. याठिकाणी मोठमोठी बंदरे उभारूनही घारापुरी प्रकल्पग्रस्तांना सामावून घेतले जात नाही. तरी याचा सारासार विचार करून घारापुरी प्रकल्पग्रस्तांच्या समस्यां व नोकरभरतीत सामावून घ्यावे अशाप्रकारचे निवेदन जेएनपीए चेअरमन संजय सेठी यांना देण्यात आले आहे. सदरचे निवेदन जेएनपीए सेक्रेटरी मनीषा जाधव यांना देण्यात आले. यावेळी त्यांनी यातून योग्य तो मार्ग काढण्याचे आश्वासन घारापुरी ग्रामपंचायत शिष्टमंडळाला दिले. यावेळी ग्रामपंचायत घारापुरीच्या सरपंच मीना भोईर, उपसरपंच बळीराम ठाकूर, सदस्या अरुणा घरत, हेमाली म्हात्रे, निता म्हात्रे, भारती पांचाळ, भरत पाटील, सचिन लाड, माजी उपसरपंच सचिन म्हात्रे, मंगेश आवटे, पदाधिकारी प्रकाश लाड, अनंत घरत, महेश थळी, शांताराम म्हात्रे, सोमेश्वर भोईर उपस्थित होते.

सरकारने टिसचा अहवाल जाहीर करावा

। नेरळ । प्रतिनिधी ।

धनगर समाज हा आदिवासी मध्ये समाविष्ट होत नसल्याची माहिती मुंबई उच्च न्यायालयाने जाहीर केले आहे. त्यामुळे धनगर समाजाचा अनुसूचित जमाती मध्ये समाविष्ट होता याबाबतचा अहवाल शासनाला सादर केला आहे.सदर अहवाल सुहासने जाहीर करावं अशी मागणी ट्रायबल फोरम कडून करण्यात आली आहे. टाटा इन्स्टिटूट ऑफ सोशल सायन्स कडून सर्वेक्षण तयार केला होता. त्या संस्थेने तयार केलेला अहवाल सरकारला सादर करावा अशी मागणी जोर धरत आहे. अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेकडे ट्रायबल फोरम नंदुरबार जिल्हाध्यक्ष नितीन तडवी यांनी केली आहे.

राज्यातील मान्यता प्राप्त व तज्ञ संस्था म्हणून प्रसिद्ध असलेल्या आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था पुणे यांनी म धनगर आदिवासी नाहीत म हे स्पष्ट केले होते.त्यानंतर देखील महाराष्ट्र सरकारने धनगर समाजाचा अभ्यास करण्यासाठी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (टिस) मुंबई यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आलेली होती.

या संस्थेने धनगर समाजाचा अभ्यास करुन महाराष्ट्र सरकारकडे अहवाल सादर केलेला आहे.गेली अनेक वर्षे हा अहवाल खितपत पडून आहे.जनतेच्या पैशातून ह्या संस्थेला अभ्यास व अहवालाचे शुल्क देण्यात आले आहे.धनगर समाजाच्या काही संघटनांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करून ते आदिवासी असल्याचा दावा केलेला आहे. ह्या प्रकरणात न्यायालयात सुनावणी सुरु आहे.

ह्या मध्ये टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (टीस) ने बनवलेला अहवाल महत्वाचा ठरू शकतो परंतु महाराष्ट्र सरकारने कोर्टाला सांगितले की हा अहवाल उघड केला जाऊ शकत नाहीत.

शासनाने या प्रकरणात जी प्रतिज्ञापत्रे सादर केलेली आहेत. त्या दोन्ही प्रतिज्ञापत्रात टीसच्या अहवालाचा संदर्भ दिलेला आहे. एकीकडे या अहवालाचा संदर्भ द्यायचा आणि दुसरीकडे तोच अहवाल जनतेसमोर आणण्यास टाळाटाळ करायची ही बाब परस्पर विसंगत ठरते. महाराष्ट्रातील सध्या भटक्या विमुक्त समाजासाठी असलेल्या आरक्षणात मधनगरफ या एकट्या स्वतंत्र जातीसाठी साडेतीन टक्के आरक्षण आहे.

उच्च न्यायालयात १२ एप्रिल २०२३ रोजी झालेल्या सुनावणीत खुद्द न्यायालयाने धनगर आरक्षणाबाबत टिसचा अहवाल गोपनीय का ठेवता ? अहवाल न्यायालयात सादर करणार की नाही ? अशी विचारणा करत उच्च न्यायालयाने राज्य सरकारला याबाबत प्रतिज्ञापत्रात खुलासा करण्याचे निर्देश दिले आहेत.असेही निवेदनात नमूद केले आहे.त्यात महाराष्ट्र शासनाने १२ जून १९७९ रोजी थनगर समाजाचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला होता. यावर संबंधित विभागात सखोल चर्चा झाली होती.

स्टॅम्प खरेदीसाठी उन्हात रांगा

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तहसील कार्यालयात सरकारी कामासाठी स्टॅम्प पेपर खरेदी करण्यासाठी येणाऱ्यांची गर्दी वाढली आहे. तहसील कार्यालयाबाहेर स्टॅम्प व्हेंडर विक्रेते अपुरे पडत असल्याने हि समस्या निर्माण झाली असून सध्या कर्जतमध्ये केवळ दोनच अधिकृत विक्रेते शिल्कक राहिल्याने लोकांना रांगा लावून उभे राहावे लागत आहे. दरम्यान, तहसील कार्यालयाच्या गेटवर स्टॅम्प खरेदी करण्यासाठी रांगा असल्याने भर उन्हात लोक उभे राहिलेले असताना दिसत आहेत.

तालुक्याचे भौगोलिक रचना ही दूरवर पसरलेला प्रदेश अशी आहे. त्यामुळे तालुक्यातील २०० हून अधिक गावातील आणि त्याहून अधिक आदिवासी वाड्यांमधून लोक शासकीय कामासाठी तहसील कार्यालयात पोहचत असतात. त्यात शालेय आणि महाविद्यालयीन कामासाठी विद्यार्थी यांना शासकीय कामासाठी आवश्यक असलेले स्टॅम्प पेपर खरेदी करण्यासाठी येत असतात. हे स्टॅम्प पेपर तहसील कार्यालय वगळता अन्य कोणत्याही ठिकाणी मिळत नसल्याने तहसील कार्यालयात गर्दी करून असतात. मात्र तहसील कार्यालयाच्या बाहेर केवळ त्या दोन्ही मुद्रांक विक्रेते शिल्लक राहिले राहिले आहेत. त्यामुळे मुद्रांक विक्रेते यांच्या कार्यालयाबाहेर रांगा लागलेल्या दिसून येतात. त्यात शाळा महाविद्यालये यांच्यासाठी आवश्यक असलेले मुद्रांक विद्यार्थ्यांना वेळेवर मिळत नसल्याने विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत.त्यात कर्जत तहसील कार्यालयाबाहेर स्टॅम्प विक्रेते यांच्या दुकानाबाहेर उभे राहण्यासाठी कोणतीही सोय नाही.त्यामुळे भर उन्हात कर्जत तहसील कार्यालयाच्या बाहेर उभे रहावे लागते. तहसीलदार, निवासी नायब तहसीलदार, नायब तहसीलदार यांची ये जा असते, असे असताना त्यांना रस्त्यावर उन्हात उभे रहिले दिसत नाहीत का? असा प्रश्न विचारला जात आहे.

माजी नगरसेवकाकडून एसटी चालकाला मारहाण

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरानचे माजी नगरसेवक शिवाजी शिंदे यांनी किरकोळ कारणावरुन एसटी चालकास मारहाण केल्याची घटना घडली.याबाबत परस्पर विरोधी तक्रारी पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या आहेत.कर्जत आगाराचे चालक गणेश रामदास थिटे आणि वाहक शरद पापालाल पवार मिनीबस घेऊन दस्तुरी फाटा येथून प्रवाशांसह निघाले. मिनीबसचे समोर शिंदे यांची मारुती ब्रिझा गाडी उभी होती.एसटी चालकाने गाडी पुढे करण्यास सांगितली असता शिंदे हे गाडी मधून बाहेर आले आणि त्यांनी आपल्याला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली अशी तक्रार मिनीबसचे चालक गणेश थिटे यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीत दिली आहे. त्याचवेळी चालक गणेश थिटे यांच्या पायावर तेथे पडलेला पेव्हर ब्लॉक फेकून मारला. सिमेंट पेव्हर ब्लॉक फेकून मारल्याने मिनीबसचा चालक जखमी झाले गणेश रामदास थिटे यांच्या ताकारीनंतर माथेरान पोलीस ठाणे येथे शिवाजी शिंदे यांचे विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

शिंदे यांनी माथेरान पोलीस ठाणे येथे जाऊन आपल्याला तसेच पत्नीला मिनीबस चालकाने शिवीगाळ केली असल्याची फिर्याद नोंदवली आहे. मिनीबस चालक हा जोरजोरात गाडीचे ॲक्सिलेटर दाबून माझे वडील आणि पत्नी यांना घाबरण्याचं प्रयत्न करीत होता. त्यात माझे वडिलांचे वय झाले असल्याने आपण हात करून थांबण्यास सांगितले तरी देखील तो थांबत नव्हत.तसेच त्यांनी शिवीगाळही केल्याची तक्रार शिंदे यांनी पोलिसात केली आहे.

सुरभी हर्बल्सच्या मुरुड शाखेचे उद्घाटन

। मुरुड । वार्ताहर ।

मुरुड जंजिरा येथे सुरभी हर्ब्लस शाखा यांच्या उद्घाटन माजी नगराध्यक्ष स्नेहा किशोर पाटील, नगमना इमतीयाज खानजादे आदींच्या हस्ते करण्यात आले. सुरभी हर्बल्स चे मालक वैद्य आप्पासाहेब पाटील सलमारा हर्बलस का मालिक वैद्य समशुद्दीन सलामारा यांच्यासह समीर दवणाक, प्रेमजी ओझानिया, प्रदीप ओगानिया, मुशदिक दळवी, शब्बीर धानसे, माज मलिक, नम्रता गायकर उदघाटन समारंभाला उपस्थित होते सदरचे सुरभी हार्बल्स, विष्णू फर्निचर समोर शाप २पेराडाईस बिल्डिंग लक्ष्मीनारायण मंदिर मुरुड जंजिरा येथे दर महिना १० दिवस वैद्य आप्पासाहेब पाटील असणार असल्याची माहिती देण्यात आली आहे तर यासाठी ७७४३९९२४४४ आणि ८४२११२०२१० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरुन

जुन्या सोन्याच्या आमिषाने फसवणूक

सदर ठिकाणी जाऊन हवालदार खैरनार,, जाधव,सावंत या पोलीस पथकान स्थानिक माहितीदार तयार करून गोपनीय माहिती काढून नमूद गुन्ह्यातील संशयित आरोपितांना ताब्यात घेतले.चौकशीत त्यांच्याकडून गुन्ह्यांच्या अनुषंगाने सखोल विचारपूस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीकडून नमूद गुन्ह्यातील फसवणूक केलेली ७०% रोख रक्कम जप्त करण्यात आली असून सदर आरोपितांना पुढील योग्य त्या कायदेशीर कार्यवाहीसाठी नागोठणे पोलीस ठाण्याचे ताब्यात दिलेले आहे.

या प्रकरणी आरोपींकडून १३ लाख ३० हजार रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आलेली आहे. सदरची कामगिरी स्थानिक गुन्हे अन्वेषन शाखेतील पोलीस उपनिरीक्षक धनाजी साठे, दीपक मोरे, जितेंद्र चव्हाण, विकास खैरनार, अक्षय जाधव, अक्षय सावंत, मोनिका मोरे, सायबरचे अक्षय पाटील व तुषार घरत यांनी केली आहे.

मोफत सायकलींचा मिळाला आधार

रेवदंड्याच्या सरपंच मनिषा चुनेकर, नागावचे सरपंच निखील मयेकर, दादा मोरे, सुरेश खोत, शरद वरसोलकर, बाळू नवखारकर, निलेश खोत, तालुका पुरोगामी युवक संघटनेचे उपाध्यक्ष समिर पाटील, संदीप खोत, राजन वाडकर, खलील तांडेल, किशोर मानकर, बाबु मोरे, एस.पी. ठाकूर, सचिन पाटील, कमरजबीन मुकादम, नागावच्या सदस्या हर्षला मयेकर आदी शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सीएफटीआयचे सर्व सभासद, शाळा महाविद्यालयीन विद्यार्थीनी, त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आणि पालकांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य...

चित्रलेखा पाटील यांच्या पुढाकाराने रेवदंड्यामध्ये मुलींसाठी सायकल वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. प्रत्येक मुलीला सायकल देण्यात आली. ज्यावेळेला मुलींना सायकल देण्यात आली. त्यावेळी मुलींच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला असताना त्यांच्या सोबत आलेल्या आई, वडीलांच्या चेहऱ्यावरही एक वेगळे हास्य फुलल्याचे दिसून आले.

मी रेवदंडा येथील मोठा कोळीवाड्यातील रहिवासी आहे. माझ्या घरापासून सुमारे एक ते दीड किलो मीटर अंतरावर शाळा आहे. इयत्ता नववीमध्ये शिक्षण घेत आहे. मला चित्रलेखा पाटील यांच्यामुळे सायकल मिळाल्याने खूप आनंद झाला आहे.

धनवी सुभाष बोबडी - मोठा कोळीवाडा, रेवदंडा

रेवदंड्यामधील कॉलेजमध्ये इयत्ता बारावीमध्ये मी शिकत आहे. कॉलेजपासून माझे घर सुमारे सात किलो मीटर अंतरावर आहे. गावापासून मुख्य रस्त्यावर आल्यावर एसटी बस अथवा अन्य खासगी वाहनांचा अधार घेत कॉलेजला यावे लागत आहे. मात्र आता मला सायकल मिळाल्याने कॉलेजमध्ये पोहचण्यासाठी लागणारा वेळ वाचणार आहे.

सृष्टी संजय नाईक - पालव

माझी मुलगी रिया शिवलकर बारावीच्या वर्गात शिक्षण घेत आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या चित्रलेखा पाटील यांच्या पुढाकाराने तसेच सीएफटीआयच्या माध्यमातून माझ्या मुलीला सायकल मोफत मिळाली. त्याचा आनंद खुप झाला आहे.

ऋतुजा रविंद्र शिवलकर - नारायण आळी - रेवदंडा

'रेंट ए बाईक' करायचे काय?

अलिकडेच त्यांनी या व्यवसायाविरुद्ध तक्रारी केल्या होत्या,याबाबत विचारणा केली असता दुचाकी भाड्याने देण्याचा व्यवसाय बेकायदेशीर असल्याचे पेण येथील उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून सांगण्यात आले आहे. या व्यवसायाला मान्यता नसल्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते यांनी सांगितले आहे.

एकीकडे कायदा आणि दुसरीकडे पर्यटकांची सोय या दोन्ही गोष्टी लक्षात घेऊन या प्रश्नातून सुवर्णमध्य काढण्याची गरज निर्माण झाली आहे.

अलिबागसह अनेक ठिकाणी दुचाकी भाड्याने देण्याचा व्यवसाय सुरु आहे. याबाबत तक्रारी आहेत. दुचाकी भाड्याने देणे हा बेकायदेशीर व्यवसाय आहे. त्याला मान्यता नाही.

- महेश देवकाते - उपप्रादेशिक परिवहन अधिकारी

पर्यटन स्थळी जाण्यासाठी काही वाहन चालकांकडून ज्यादा पैसे घेतले जातात. आर्थिक लुट अनेक वेळा होते. परंतू एक किंवा दोन पर्यटकांना फिरण्यासाठी दुचाकी वाहन उपयोगी ठरते. अलिबागमध्ये दुचाकी भाड्याने दिल्या जातात. त्याचा आम्हाला फारच चांगला उपयोग होतो.

- राकेश सावंत- पर्यटक

आरोपीला सक्तमजुरी

गांभीर्य ओळखून पोलीसांनी तातडीने गुन्हा दाखल करून आरोपी देविदास मोकल याला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी करून तपासण पुर्ण केला. त्यानंतर त्याच्याविरोधात न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

या खटल्याची सुनावणी विशेष न्या.एस.एस. शेख यांच्या न्यायालयात झाली. सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील म्हणून ॲड. प्रतिक्षा वडे - वारंगे यांनी काम पाहिले. पिडीत मुलगा, तपासिक अंमलदार यांची साक्ष महत्वपूर्ण ठरली. त्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित शिंदे, पैरवी अधिकारी दिक्षा राठोड, पोलीस शिपाई यांचे सहकार्य मोलाचे ठरले. तसेच तपासिक अंमलदार कल्लुरकर यांचा तपास महत्वपुर्ण ठरला. ॲड. प्रतिक्षा वडे - वारंगे यांनी केलेला युक्तीवाद ग्राहय धरून न्यायालयाने दोषी ठरवत देविदास मोकल याला दहा वर्षे सक्त मजूरी व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली.

मच्छिमारांना लागले पावसाळ्याचे वेध

लागला आहे. जून महिन्यांपासून पावसाचा हंगाम सुरु होणार आहे. या कालावधीत खोल समुद्रात मासेमारीला बंदी आहे. एक जूनपासून ३१ जूलैपर्यंत ही बंदी राहणार असल्याने मच्छीमारांनी त्यांच्या बोटी आता किनारी लावण्यास सुरुवात केली आहे. अलिबागसह अनेक समुद्रकिनारी बोटी लावण्याची लगबग सुरु झाल्याचे चित्र आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये पाच हजारापेक्षा अधिक बोटी आहेत. त्यापैकी काही बोटी यांत्रिकी व काही बोटी बिनयांत्रिकी आहेत. या बोटींद्वारे मच्छीमार मासेमारी व्यवसाय करतात. मासेमारी करून मच्छीमार त्यांच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. या व्यवसायातून अनेकांना रोजगार मिळतो. जून व जुलै हे दोन महिने वगळता अन्य हंगामात मच्छीमार मासेमारी करतात. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून पावसाळा हंगाम सुरु होणार आहे. या हंगामात समुद्राला मोठे उधाण येण्याबरोबरच वादळ येते. या उधाणाबरोबरच वादळाचा फटका मच्छीमारांना बसू नये. मच्छीमारांची जिवीत व वित्तहानी होऊ नये तसेच जून व जुलै हे दोन महिने मासळीच्या प्रजननाचे दिवस असतात. त्यामुळे या कालावधीत मासेमारी करण्यास बंदी घातली जाते. जून महिन्याच्या एक तारखेपासून ३१ जुलैपर्यंत जिल्ह्यात मासेमारीला बंदी घालण्यात आली आहे. समुद्रात मासेमारी करण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील मच्छीमारांनी त्यांच्या बोटी समुद्रकिनारी उभ्या करण्यास सुरुवात केली आहे. गेल्या आठ दिवसांपासून जिल्ह्यातील अलिबागसह अनेक समुद्रकिनारी बोटी किनारी लावण्याची लगबग सुरु झाली आहे. बोटी किनारी सुरक्षित उभ्या करण्यासाठी मच्छीमार कामाला लागले आहेत. जेसीबी व क्रेनच्या मदतीने या बोटी किनारी उभ्या केल्या जात आहेत. तसेच पावसाळ्यात बोटींचे नुकसान होऊ नये यासाठी त्यांना प्लास्टीक आवरण व अन्य सुरक्षेबाबत प्रयत्न केला जात आहे.

सुशोभिकरण झालं अन् तलावांच रुप पालटलयं

१५ व्या वित्त आयोग माध्यमातून आणि शासनाच्या विविध योजना तसेच कंपन्यांच्या विकास निधीतून तलावांची कामे हाती घेण्यात आली होती. यासाठी लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, महिला बचत गट, नागरिक यांनी तलाव संवर्धन अभियानात आपला सक्रिय सहभाग नोंदवला होता. या सर्वांच्या सहकार्याने जिल्ह्यातील १५३ तलावांचे संवर्धन करण्यात जिल्हा परिषद प्रशासनाला यश मिळाले असून, उर्वरित २५ तलावांचे संवर्धन करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की, माझे अशिल सौ.श्रृती श्रीकांत कोंडीलकर व श्री.श्रीकांत गजानन कोंडीलकर रा.सोहम अपार्टमेंट, पनवेल-रायगड यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत, व त्यावरील निवासी सदनिका ह्या विद्यमान मालक श्री.गौरव तुळशीराम पाटील व श्री.दामोदर नारायण भोईर रा.पेण ता.पेण जिल्हा -रायगड यांचेकडू विकत घेतल्या आहेत.

मिळकतीचे वर्णन- जिल्हा रायगड तालुका व पोट तुकडी पेण मौजे-पेण येथील सर्व्हे नं.१०६/१ क्षेत्र २-१९-० हे.आर.चौ.मी. आकार रू.१४०-१६ पैसे ही जमिन व या जमिनीमध्ये उभी असलेली शार्विल अपार्टमेंट या नियोजीत इमारतीतील निवासी सदनिका नं.१०१, १०२, पहिला मजला, २०१, २०२,दुसरा मजला, व ३०१, ३०२, तिसरा मजला या या नोटीसीचा विषय आहेत.

तरी वरील जमिन व या जमिनीमध्ये उभी असलेली शार्विल अपार्टमेंट या इमारतीतील निवासी सदनिका संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण,दान,जप्ती, लिन, लीज, चार्ज जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशीर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून ८ (आठ) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरची जमिन व शार्विल अपार्टमेंट या नियोजीत इमारतीतील निवासी सदनिका ह्या निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजण्यात येईल. वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

पेण-रायगड
दि.३१/०५/२०१३

सही/-
ॲड.संजय भास्कर पाटील
परमार प्लाझा, शॉप नं.१६,
शिवाजी पथ, पेण-रायगड ४०२१०७
मोबाईल ९८८१९१५२१९

पनवेल महानगरपालिका
नगरपथविक्रेता समिती निवडणूक सन २०२३-२४ करिता माघारीनंतर उमेदवारांची अंतिम यादी

अ.क्र.	उमेदवाराचे नाव, पत्ता व नोंदणी क्रमांक	प्रवर्ग	शेरा
१	श्री. रितेश महादेव खकाळ, रा. दत्तकृपा सोसायटी, रुम नं. २४, से ६, नवीन पनवेल ८०२७९६_HK_ ३९७६७९१४१९०१	सर्वसाधारण	वैध
२	श्रीम. आशा राजू मोरे, रा. वास्तुविहार, से. १४, खारघर ८०२७९६_HK_ ६८२२५३०९८९५१	सर्वसाधारण (महिला)	वैध
३	श्रीम. सुचिता गजानन इवलेकर,रा.छट अपार्टमेंट, ए-३०३, प्लॉट नं.३ से. १२, कामोठे ८०२७९६_HK_ ६८१९९६५०१५६१	विकलांग (महिला)	वैध
४	श्रीम. प्रतिक्षा अनिल माळी, रा.बी-१७/२, कुंजविहार सोसायटी, घरकुल से. १५, खारघर ८०२७९६_HK_ ३४२५८८५२४०४३	इतर मागास प्रवर्ग	वैध
५	श्रीम. पुष्पा धाया गोवारी, रा. घर नं. १३४६, से. १७, यमुना बिल्डींगजवळ कामोठे ८०२७९६_HK_ ५६४६४५८८७१६४	इतर मागास प्रवर्ग	वैध
६	श्री. मंगेश पंढरीनाथ गोवारी, रा. १२४०-ए, मानसरोवर रोड, जुई कामोठे ८०२७९६_HK_ ४०४८५७८१७६६१	सर्वसाधारण	वैध
७	श्रीम. अंजू राजू कोळी, रा. घर नं. ११५३, वडघर, ता. पनवेल ८०२७९६_HK_ २४५०७१९१२०६१	विकलांग महिला	वैध
८	श्रीम. शारदा विश्वास देसाई, रा.बी-१, रुम नं. ३, मानसी पार्क, पेठ गाव ता. पनवेल, ८०२७९६_HK_ ४३४६३५७९२०२७	सर्वसाधारण (महिला)	वैध
९	श्री. दत्तात्रेय जीवराज वाफारे, रा. बी-२०३, सुरभी अपार्टमेंट, से. २१, कामोठे ८०२७९६_HK_ २११८११९८४८४५	सर्वसाधारण	वैध
१०	श्रीम. छाया तानाजी मादळे, रा. १०२, स्टार इन्क्लेव्ह सोसायटी, से. २१ कामोठे ८०२७९६_HK_ ४५०२६७२०७२४३	सर्वसाधारण (महिला)	वैध
११	श्री. भिकाजी सुखदेव लोंढरे, रा. फ्लॅट नं. १९, श्री समर्थ सोसायटी, से. १२ खारघर ८०२७९६_HK_ ६२०४०३८२७५६०	अनुसूचित जाती	वैध
१२	श्री. अनिकेत पांडुरंग थोरात, रा. ई-१, ए-१, से. १४, नवीन पनवेल ८०२७९६_HK_ ४३७६४६२४०९६९	सर्वसाधारण	वैध
१३	श्रीम. मेघा तानाजी नांगरे, रा.ए/४५/६,से. १३ नवीन पनवेल ८०२७९६_HK_ ४१११९७५४३८०७	सर्वसाधारण (महिला)	वैध

सही/-
(शितल स. कुलकर्णी)
निवडणूक निर्णय अधिकारी तथा
सहाय्यक कामगार आयुक्त, पनवेल

निवडक

वृद्धाश्रमांना आर्थिक पाठबळ

नवी मुंबई : महाराष्ट्र सरकारच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांद्वारे चालवण्यात येणाऱ्या वृद्धाश्रमांना समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपयुक्ततामार्फत ७२.६० लाख परिपोषण अनुदान मंजूर करण्यात आले आहे. हे अनुदान समाजकल्याणचे सहायक आयुक्त, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांना उपलब्ध करून दिले आहे. यामुळे स्वयंसेवी संस्थेमार्फत चालवणाऱ्या वृद्धाश्रमातील वृद्ध प्रवेशितांना सेवा देण्यास मदत होणार आहे.

दाखल्यांसाठी शिबीर

रसायनी : शैक्षणिक कामाकरीता लागणाऱ्या दाखल्यांसाठी महाशिबिराचे आयोजन खालापूर तहसील कार्यालयाच्या माध्यमातून करण्यात आले आहे. याचा लाभ घ्यावा असे तहसिलदार आयुब तांबोळी यांनी केले आहे. वासांबेत जनता विद्यालय मोहोपाडा १२ जून, जिल्हा परिषद रिस शाळेत १६ जून, मोहोपाडा प्रबळ शाळेत २३ जून अशा प्रकारे शिबिराची आखणी करण्यात आली आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन वासांबे शितल मंदाडे यांनी केले आहे.

हेल्मेटची सक्ती

नवी मुंबई : दुचाकीस्वारासह त्याच्यासोबत प्रवास करणाऱ्यांना हेल्मेटचा वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे, असे असताना शासकीय, खासगी कार्यालये, शैक्षणिक संस्थांमध्ये चालक हेल्मेटचा वापर करत नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे नवी मुंबईतील सर्व शासकीय, खासगी कार्यालये तसेच शैक्षणिक संस्थामधील कर्मचारी-अधिकारी, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये हेल्मेटबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

बेकायदा वाहनतळ

पनवेल : खारघर सेक्टर १९ पासून ३४ आणि ३५ मधील मेट्रो पुलाखाली दुतर्फा बेकायदा वाहने उभी केली जात आहेत. त्यामुळे या रस्त्याला वाहन तळाचे स्वरूप आल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. एका लेनचा वापर दुकानदार वाहनासाठी मध्यभागी एक लेन सोडून तिसऱ्या लेनवर रस्त्याच्या कडेला दुकाने, हॉटेल तसेच बँक आहेत. याशिवाय जवळपासच्या इमारतीत वास्तव्यास असणारे नागरिक स्वतःची अवजड वाहने मेट्रो पुलाखाली पिलरला लागून उभी करतात.

जीर्ण इमारतीला टेकू

पनवेल : कळंबोली लोखंड पोलाद बाजारात असलेल्या या इमारतीमध्ये आशिया खंडातील सर्वात मोठे लोहलोखंड पोलाद मार्केट आहे. या ठिकाणी सिडकोने फॅसिलिटी सेंटर बांधले आहे. या इमारतीमध्ये लोह पोलाद बाजार समितीचे कार्यालय आहे. कॅनरा व युनियन या दोन बँकांची कार्यालये, पनवेल आरटीओचे ऑफिस असल्याने दररोज हजारो नागरिकांची गर्दी असते. अशातच या इमारतीला लावलेले टेकू गंजलेले असल्याने पावसाळ्यात ही इमारत धोकादायक ठरण्याची भीती व्यक्त केली जाते.

रिक्त हातांना मिळाले काम

हजारो महिलांना रोजगार
अर्थचक्र झाले गतिमान

प्रमोद जाधव

। अलिबाग ।

घरातील कर्त्यावर भार असल्याने अनेकांना कुटूंबाचा उदरनिर्वाह चालविताना तारेवरची कसरत करावी लागते. वाढत्या पर्यटनामुळे अलिबागसह नागाव, रेवदंडा, श्रीवर्धन, दिवेआगर अशा अनेक समुद्रकिनारी असलेल्या हॉटेल, कॉटेजमध्ये जेवण बनविण्याचे काम महिला वर्गांना मिळत आहे. भाकरी तयार करण्यापासून घरगूती जेवण बनविण्याचे काम महिलांच्या हाताला मिळाले आहे. यातून सुमारे सात हजारपेक्षा अधिक महिलांना रोजगार मिळत असल्याने त्यांना आर्थिक बळ मिळत असल्याचे चित्र आहे.

ग्रामीण भागासह शहरी भागातही यापुर्वी बेरोजगारी होती. कोरोनासारख्या गंभीर स्थितीचा सर्वाधिक फटका हातावर आणून पानावर खाणाऱ्या सर्वसामान्यांना बसला. त्यात हातालाकाम नाही. अशातच कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न भेडसावू लागला. या बिकट परिस्थितीत समुद्रकिनारे पुन्हा सुरु झाले. याठिकाणी सुरु असलेल्या कॉटेज, हॉटेल, खाणावळ आदी ठिकाणी पर्यटकांची पावले वळू लागली आणि रिक्त हातांना काम मिळाले.

जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे ठिकाण म्हणून ओळखले जाते. जिल्ह्यातील समुद्रकिनारे, गडकिल्ले, लेणी अशा वेगवेगळ्या पर्यटन स्थळांना पर्यटक आवर्जून भेट देतात. वर्षाला दहा लाखापेक्षा अधिक पर्यटक जिल्ह्यात येतात. पर्यटन वाढीमुळे रोजगाराचे साधन वाढत आहे. अलिबाग, नागाव, आक्षी, किहीम, रेवदंडा, मांडवा, आवास, सासवणे, दिवेआगर, श्रीवर्धन, बोर्ली, काशिद, मुरुड आदी ठिकाणी पर्यटक फिरण्यास येतात. परंतू घरगुती पध्दतीचे जेवणाची ओढ वाढत आहे. पर्यटकांच्या पसंतीनुसार जेवण मिळावे यासाठी हॉटेल, कॉटेज व्यावसायिक आपआपल्या परीने प्रयत्न करीत आहेत. हातावर पोट सांभाळणाऱ्या हजारो महिलांना समुद्रकिनाऱ्यावरील पर्यटन व्यवसायातून हक्काचा रोजगार मिळू लागला आहे. गेल्या सात वर्षात यामध्ये आमुलाग्र बदल होऊ लागला आहे.

काही महिलांना हॉटेल, कॉटेजमध्ये जेवण बनविण्याचे तर काही महिलांना साफसफाई करण्याचे काम मिळत आहे. तसेच काही गावांमधील महिला एकत्र येऊन हॉटेल कॉटेज चालविण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे आजूबाजूच्या गावांमधील महिलांना रोजगार मिळू लागला आहे.

आर्थिक संकटात सापडलेल्या ग्रामीण भागातील कुटूंबाला आर्थिक बळ या व्यवसायातून मिळत आहे. शनिवार व रविवार सुट्टीच्या दिवशी पर्यटक समुद्रकिनारी फिरण्यास येतात. त्यामुळे बाजूच्या गावांमधील महिलांना दोन दिवस काम मिळत आहे. सुट्टीच्या हंगामात महिनाभर महिलांना काम मिळत असल्याने गावांमधील आर्थिक स्थिती सुधारण्याच्या वाटेवर आहे.

बाजार समित्यांसाठी सेझ उपयुक्त

संतोष जंगम यांचे प्रतिपादन

। खोपोली । प्रतिनिधी ।

मागील पाच वर्षापासून बऱ्याच गोष्टींवर सरकारने बंदी घातली आहे. माल येतो त्यावरही बंदी असल्यामुळे बाजार समितीची आर्थिक उलाढाल कमी स्वरूपाची आहे. जिल्ह्यातील विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) प्रकल्पाकरिता संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी सरकारने ठोस पावले उचलून जमिनी परत कराव्यात यासाठी शेकाप सरचिटणीस आ.जयंत पाटील यांनी विधिमंडळ अधिवेशनात सातत्याने आवाज उठवून सरकारचे लक्ष वेधले होते. त्यामुळे सेझ पुन्हा चालू झाल्यास कृषी उत्पन्न बाजार समितीची भरभराट होईल असा विश्वास खालापूर तालुका नवनिर्वाचित सभापती संतोष जंगम यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला आहे.

> मागील पाच वर्षापूर्वी सभापतीपदाची जबाबदारी पक्षाने दिली होती. यंदाही सभापतीपदाची जबाबदारी आ. जयंत पाटील यांनी दिल्याबद्दल सर्व संचालक, पक्षाचे नेत्यांचे आभार. आगामी काळात शेतकऱ्यांचे आणि व्यापाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.
>
> -संतोष जंगम
> नवनिर्वाचित सभापती
> कृषी उत्पन्न बाजार समिती खालापूर

पंधरा वर्षापासून कृषी उत्पन्न बाजार समितीवर एक हाती सत्ता कायम राखण्यासाठी आ. जयंत पाटील, शेकापक्षाचे जिल्हा चिटणीस आस्वाद पाटील यांच्या नेतृत्वाखाली यश मिळाले आहे. मागील पाच वर्षापासून जंगम यांनी सभापती पदाची धुरा सांभळली होती. यंदाही बाजार समितीवर शेकापक्षाची एकहाती सत्ता आल्यानंतर जंगम यांच्यावर सभापती पदाची जबाबदारी आ.जयंत पाटील यांनी दिली आहे. जिल्ह्यात बाजार समितीवर निवडून आलेल्या सभापती, उपसभापती आणि संचालकांचा सत्कार समारंभ रविवारी पेण येथे आयोजित केला होता. आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, माजी आ. बाळाराम पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. यावेळी कार्यक्रमासाठी सभापती संतोष जंगम, उपसभापती जयवंत पाटील, संचालिका शिवानी जंगम, संचालक शांताराम पाटील, विलास कांबळे आदि उपस्थित होते.



ताडपत्री विक्रेते ग्राहकांच्या सेवेसाठी सज्ज

। पनवेल । वार्ताहर ।

येत्या काही दिवसांत मान्सूनचे मुंबईसह महाराष्ट्रात आगमन होणार आहे. मान्सूनपूर्व तयारीसाठी ताडपत्री विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांनीही कंबर कसली आहे. पनवेल शहरातील टपालनाका परिसर विविध रंगांच्या ताडपत्र्यांनी सजला आहे. मान्सूनच्या तयारीत येथील ताडपत्री विक्री करणारे व्यापारीही ग्राहकांच्या सेवेसाठी सज्ज झालेले पाहायला मिळत आहेत. व्यापारीदेखील ग्राहकांची प्रतीक्षा करत असल्याचे चित्र सध्या बाजारात पाहायला मिळत आहे.

राज्यात हवामान खात्याकडून सरासरी पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आल्याने पावसावर अवलंबून असलेल्या ताडपत्री, छत्री, रेनकोट व इतर व्यवसाय करणाऱ्या व्यापारी दुकानदारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. महिना संपत आला तरी पावसाचे लक्षण दिसत नसल्याने पावसावर अवलंबून असलेल्या व्यापारी वर्गात चिंतेचे वातावरण आहे.

पाऊस कोसळण्याच्या अगोदरच ग्राहक बाजाराकडे वळतील आणि छत्री, ताडपत्री व इतर वस्तू खरेदी करतील, अशी आशा त्यांना लागून राहिली आहे. बाजारात ग्राहकांची वर्दळ नसल्याने व्यापाऱ्यांची चिंता वाढली आहे. वाहतुकीचे दर दुपटीने वाढल्याचा परिणाम ताडपत्रीच्या किमतीवर झाला आहे. पावसाला सुरुवात होताच ताडपत्रीच्या किंमती आणखीन वाढतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

वीज प्रकल्प पूर्ण करण्यासाठी

हेलिकॉप्टरचा वापर

मुंबई ऊर्जा मार्ग प्रकल्पाची प्रयत्नांची पराकाष्ठा

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

राज्याचा विजेचा तुटवडा भरून काढण्याच्या उद्देशाने राबविल्या जाणाऱ्या मुंबई ऊर्जा मार्ग प्रकल्पात प्रयत्नांची पराकाष्ठा केली जात आहे. निर्धारित वेळेत प्रकल्प पूर्ण करण्यासाठी टॉवर उभारणीसाठी कंपनी हेलिकॉप्टरचा वापर करत आहे. महाराष्ट्रात अशा प्रकारे हेलिकॉप्टरचा वापर करून प्रकल्प उभारणी करण्याची ही पहिलीच घटना असावी.

सदरच्या प्रकल्पासाठी अंबरनाथ तालुका ते पनवेल तालुका यांच्या दरम्यान असणाऱ्या डोंगर रांगांच्यात उच्च वीज दाब वाहून नेणाऱ्या वाहिन्या आणि टॉवर उभारणीचे काम वेगाने सुरु आहे. साधारणपणे १४ किलोमीटर लांबीच्या वाहिन्या या दुर्गम डोंगर रांगांच्यातून जाणार आहेत. आव्हानात्मक परिस्थितीत टॉवर उभारणीचे काम करावे लागते. कितीही खडतर परिस्थिती असली तरीही प्रकल्प वेळेत पूर्ण झालाच पाहिजे या विजिगिषु वृत्तीने कंपनी अत्याधुनिक विकसन प्रणालीचा अवलंब करत आहे.

> या प्रकल्पासाठी वापरण्यात येणारे हेलिकॉप्टर हे उत्कृष्ट दर्जाचे असून ते चालविणाऱ्या पायलटकडे हजारो तासांचा हेलिकॉप्टर उडविण्याचा अनुभव आहे. आमच्या पायलटनी यापूर्वी भारतीय सेनेसाठी सेवा दिलेली आहे. अगदी माउंट एव्हरेस्टच्या सर्वोच्च बिंदूपर्यंत उडण्याची या हेलिकॉप्टरची क्षमता आहे.
>
> -राहुल उनियाल
> हेलिबेसचे ऍव्हेशन हेड

या प्रकल्पाचे राष्ट्रीय महत्व ध्यानात घेता तो वेळेत पूर्ण होणे अत्यावश्यक आहे. म्हणून स्टरलाईट पॉवर अंतर्गत मुंबई ऊर्जा मार्ग प्रकल्प डोंगर प्रदेशातील कन्स्ट्रक्शन साईटवर अवजड साहित्य पोहोचविण्याच्या दृष्टीने हेलिकॉप्टरचा वापर करत आहे. हे हेलिकॉप्टर दिवसात ५० ते ६० फेऱ्या मारत टॉवर उभारणीचे साहित्य कन्स्ट्रक्शन साईटवर पोहोचवत आहे.



हेलिकॉप्टरच्या खाली मजबूत साखळीला हुक बांधून त्याच्या सहाय्यतेने टॉवर उभारणीसाठी लागणारे साहित्य दुर्गम ठिकाणी पोहोचविले जाते. आत्ताचे तापमान आणि भौगोलिक परिस्थिती पाहता ८०० ते ८५० किलोग्रॅम वजनाचे साहित्य एका वेळेस उचलून डोंगरातील साईटवर पोहोचविले जाते.

मजुरांअभावी कामे रखडली

। पाताळगंगा । वार्ताहर ।

काही दिवसांपासून तापमानाचा पारा ४० अंशांच्या आसपास आहे. जिल्ह्यातील उन्हाचा कडाका वाढत असल्याने नागरिकांच्या अंगाची लाही-लाही होत आहे. उन्हात घाम गाळणारा शेतकरीही वाढत्या तापमानामुळे हैराण झाला आहे. या कडक उन्हात मजूरही शेतकाम करण्यासाठी येण्यास तयार नसल्याने शेतकऱ्यांची मान्सूनपूर्व कामे रखडली आहेत. पावसाच्या आगमनाला काही दिवसाचा शिल्लक असल्याने ग्रामीण भागात मान्सूनपूर्व कामांची लगबग सुरू आहे.

खालापूर परिसरात मशागतीच्या कामांना वेग आला आहे. बैलांच्या साह्याने नांगरणी, बांध घालणे, तरवा करण्याची कामे सुरू आहेत. गेल्या दोन आठवड्यांपासून उन्हाचा वाढलेला पारा खाली येण्याचे नाव घेत नसल्याचा परिणाम सर्वच क्षेत्रात झाला आहे. उन्हात घाम गाळणारा शेतकरीही या वाढत्या तापमानामुळे हैराण झाला आहे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी रोजगार हमी योजनेअंतर्गत विविध कामे सुरू आहेत. या ठिकाणीही मजूर उन्हामुळे काम करण्यासाठी त्रासला आहे.

मे महिना हा शेतकऱ्यांचा मान्सूनपूर्व कामे करण्यासाठी असतो. मात्र मे महिना सुरू झाल्यापासून दररोज ३८ ते ४० अंश तापमानात काम करण्यासाठी मजुरवर्गही कामासाठी घराबाहेर पडत नसल्याने शेतकरी अधिकच अडचणीत आला आहे.

पनवेलच्या पेशवेकालीन वडाले सरोवरामध्ये कमळे मोठ्या प्रमाणात फुलली आहेत. त्यामध्ये लावलेल्या कारंजावर उन्हाचा प्रकाश पडला की आपोआपच इंद्रधनुष्याचे रंग मनाला मोहवून टाकतात. (छायाचित्र : राजेश डांगळे)

आंब्याच्या दरात कमालीची घसरण

। अलिबाग । वार्ताहर ।

ढगाळ वातावरण आणि दोन दिवस पावसाचा झालेला शिडकाव, यामुळे आंब्याचे भाव कमालीचे घसरले आहेत. यंदा उशिराने आलेल्या आंबा पिकाचा भर सध्या जोमाने सुरू आहे. मात्र, पावसाची भीती आणि अचानक वाढलेली आवक यामुळे प्रति डझन २०० रुपयांपेक्षा कमी किमतीला आंबे विकावे लागत आहेत. सध्या रस्त्यांच्या कडेला आंबा विकणाऱ्या स्थानिक महिलांकडे पर्यटकांची खरेदीसाठी झुंबड उडत आहे. मान्सूनचे आगमन लवकर होणार असल्याने आंब्याचा हंगाम पुढील आठवडाभरापर्यंतच मर्यादित राहणार आहे. त्यामुळे विक्रेत्यांमध्येही आता चढाओढ लागली आहे.

अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन येथे येणारे पर्यटक आंबे विकत घेत आहेत. यासाठी येथील महिला रस्त्याच्या कडेला आंबे विकताना दिसत आहेत. त्यामुळे खरेदीसाठी पर्यटकांची झुंबड उडत आहे.

मुख्याध्यापकाच्या विरोधातच तक्रार?; पंचक्रोशीत चर्चेला उधाण

सावरसई परिसरात अनधिकृत बांधकामावर कारवाईस टाळाटाळ

। पेण । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील सावरसई येथील शासकीय आश्रमशाळेच्या मालकीच्या जागेत मोठयाप्रमाणात अतिक्रमण करण्यात आले आहे. याबाबतची तक्रार पंचायत समिती सदस्य निळकंठ दिवेकर यांनी केली होती. जवळपास एक महिन्याचा कालावधी उलटून देखील एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्पाकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. सावरसई शाळेचे मुख्याध्यापक या बांधकामांना मदत करत असल्याची चर्चा सावरसई परिसरात जोर धरु लागली आहे.

याबाबत एकात्मिक बालविकास अधिकारी कार्यालयाचे सहप्रकल्प अधिकारी पी.एन.कलाल यांनी सांगितले की, सदर अतिक्रमण व जागा मोजणीबाबत आश्रम शाळेचे मुख्याध्यापक यांच्याबरोबर पत्रव्यवहार केला आहे. आश्रम शाळेचे मुख्याध्यापक हसुराम पाटील यांनी तलाठी सजा कामार्ली यांच्याबरोबर २ मे रोजी शासकीय आश्रमशाळेच्या जागेचे सातबारे मिळावे म्हणून पत्रव्यवहार केला आहे. तसेच उपअधिक्षक तालुका भूमी अभिलेख यांनी २ मे रोजी मोजणीसाठी पत्रव्यवहार केल्याची माहिती मिळाली. शासकीय आश्रमशाळा वरसईची एकूण जमीन ३.६९.३ हेक्टर एवढी वेगवेगळया चार सातबाऱ्याची आहे. मात्र, प्रथमदर्शी या जागेवर मोठयाप्रमाणात अतिक्रमण झालेला दिसून येत आहे.

तुम्हाला काय करायचंय ते करा : मुख्याध्यापक

मुख्याध्यापक अवैध्य बांधकामांना मदत करत आहेत की नाहीत याबाबत विचारणा करण्यासाठी हसुराम पाटील यांच्या भ्रमंती ध्वनी क्रमांक ८२६२०७७६९६ या क्रमांकाशी संपर्क करुन विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, मी आपल्याशी फोन वर बोलू शकत नाही तुम्हाला काय करायचय ते करा अशी धमकीच त्यांनी दिली.

> शासकीय आश्रमशाळा सावरसईची जागा साधारणतः सात ते आठ एकर ऐवढी आहे. यामध्ये मोठयाप्रमाणात अतिक्रमण गेल्या २ ते ३ वर्षात झाले असून यापूर्वीच्या मुख्याध्यापकांनी जागेत कोणालाही अतिक्रमण करुन दिले नव्हते. मात्र, आत्ताचे मुख्याध्यापक व कर्मचारी आपली जबाबदारी योग्यपणे पार पाडत नसल्याने बिनधास्तपणे आश्रमशाळेच्या जागेत अवैध्य बांधकाम झाले आहेत व यामध्ये चायनिज सेंटर सह वेगवेगळी दुकाने थाटली आहेत.
>
> – निळकंठ दिवेकर, पंचायत समिती सदस्य

याबबात पेण पोलीस ठाण्यात गुन्हा देखील दाखल झाला आहे. असे असताना देखील मुख्याध्यापकांकडून ज्या गतीने अतिक्रमण हटविण्यासाठी कार्यवाही व्हायला हवी होती त्याप्रमाणे होत नाही. शासकीय मोजणी असताना देखील फक्त अर्ज देउन मुख्याध्यापकांनी आपली जबाबदारी झटकलेली आहे असेच म्हणावे लागेल. आत्ता ७ जुनपासून पावसाळा सुरु होईल आणि भुमी अभिलेख कार्यालयातून मोजणीची कामे बंद होतील. याचाच अर्थ पावसाळयात पुढील तीन ते चार महिन्यात अतिक्रमण होतील हे नक्की.

धोनी नावाचा जादूगार

वीस षटकांच्या अर्थात ट्वेंटी ट्वेंटीचा पहिल्या विश्वचषकात भारताने जो संघ पाठवला होता त्यात तरुण खेळाडूंचा समावेश होता. सचिन तेंडुलकर, सौरव गांगुली इत्यादी, तेव्हा चांगल्या भरात असलेल्या पण वयाने मोठ्या खेळाडूंना, बसवण्यात आले होते. महेंद्रसिंग धोनी हा तेव्हा पहिल्यांदा कर्णधार झाला होता. तेव्हा सर्वांची अशी कल्पना होती की, या प्रकारावर तरुणांचेच वर्चस्व राहील. प्रत्यक्षात आज पंधरा वर्षांनंतर उलटीच स्थिती आहे. खेळाडूचं वय कितीही असलं तरी त्याचा फिटनेस आणि अनुभवाचा वापर करण्याची क्षमता उत्तम असेल तर तो या प्रकारात सरस ठरू शकतो हे वारंवार दिसलं आहे. खुद्द धोनी हाच त्याचे उत्तम उदाहरण ठरला आहे. गमतीचा भाग असा की, तेव्हा तरुण असलेल्या धोनीने यशस्वी कर्णधार असे बिरुद मिळाल्यानंतर सेहवाग, लक्ष्मण इत्यादी ज्येष्ठ खेळाडूंना निवृत्त होण्यास भाग पाडले होते. आज तो स्वतः मात्र निवृत्तीची वेळ अधिकाधिक लांबवत चालला आहे. सोमवारी रात्री चेन्नई सुपर किंग्जने आपले पाचवे विजेतेपद जिंकले तेव्हा धोनीचा बहुधा हा अखेरचा सामना असेल आणि तो निवृत्ती जाहीर करेल असे सर्वांना वाटत होते. पण प्रेक्षकांचं प्रेम पाहून मला आणखी एक वर्ष खेळण्याची इच्छा होत आहे असे त्याने जाहीर केले. अर्थात, धोनीच्या चाहत्यांची त्याबद्दल फार तक्रार नसेल. ज्या तडफेने आणि चपळाईने त्याने अंतिम सामन्यात शुभमन गिलला यष्टिचित केले ते पाहता धोनीची चाळिशी उलटून गेली आहे यावर कोणाचा विश्वास बसणार नाही. धोनीच नव्हे तिशी पार केलेल्या अनेक खेळाडूंचा चेन्नई सुपर किंग्ज संघात वारंवार समावेश झालेला दिसतो. धोनीचं वैशिष्ट्य हे की तो या सर्वांकडून अतिशय उत्तम खेळ करवून घेतो. एकेकाळी, अजिंक्य रहाणेला भारताच्या टी ट्वेंटी संघात स्थान मिळू शकत नाही असं धोनीने जाहीरपणे सांगितले होते. पण त्याच रहाणेचा एक नवीन अवतार धोनीच्याच चेन्नई संघातून यंदा आपल्याला पाहायला मिळाला. ऋतुराज गायकवाड किंवा तुषार देशपांडेसारख्या (किंवा पूर्वी शार्दूल ठाकूर, मोहित शर्मा, जोगिंदर सिंग इत्यादी अनेक) बिननावाच्या खेळाडूंना त्याने उत्तेजन दिले. महत्वाचे म्हणजे एक-दोन सामन्यात अपयशी झाले तरी त्यांना लगेच त्याने डावलले नाही. आयपीएलमध्ये खऱ्या संघभावनेने खेळणारे केवळ दोनच संघ आहेत. एक मुंबई व दुसरा चेन्नई. याचमुळे मुंबईतून रोहित शर्मा आणि चेन्नईतून धोनी हेच सातत्याने कर्णधार राहिले आहेत व याच संघांनी प्रत्येकी पाच वेळा आयपीएल विजेतेपद जिंकले आहे. आयपीएलमध्ये एक-दोन हंगामात अनेक तारे चमकून जातात. राहुल तेवटिया, मयांक शर्मा, संजू सॅमसन किंवा यंदाचे सितारे रिंकू सिंग, यशस्वी जैस्वाल इत्यादींची नावे या संदर्भात आठवतात. मात्र सातत्यपूर्ण यश मिळवण्यासाठी प्रचंड कष्ट व साधना यांची गरज असते. त्याचे उत्तम उदाहरण असलेला खेळाडू म्हणून धोनी आणि संघ म्हणून चेन्नई हे नक्कीच कौतुकास पात्र आहेत.

दिल्लीतील कुस्ती

एकीकडे संसदेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन होत असताना आणि पंतप्रधान लोकशाहीचे गुणगान गात असतानाच काहीशे मीटर अंतरावर आपल्या नामांकित कुस्तीपटूंची पोलिस धरपकड करीत होते. रविवारी सर्व जगाने ही दृश्ये पाहिली. बजरंग पुनिया, विनेश फोगट, साक्षी मलिक हे जगभरात भारतासाठी पदके मिळवणारे कुस्तीपटू तेवीस एप्रिलपासून दिल्लीत धरणे देत आहेत. कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष ब्रिजभूषण सिंग हे महिला खेळाडूंचे लैंगिक शोषण करीत असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे दाखल झाल्या आहेत. दंडाधिकाऱ्यासमोर या तक्रारदारांनी प्रतिज्ञापत्रांवर या तक्रारी केल्या आहेत. त्यामुळे न्यायालयात त्या साक्षी म्हणून ग्राह्य मानल्या जातील. पण तरीही पोलिसांनी कोणतीही कारवाई केलेली नाही. कारण, सिंग हे भाजपचे खासदार असून उत्तर प्रदेशातील ठाकूर समाजात त्यांचा मोठा प्रभाव असल्याचे मानले जाते. हे सिंग रविवारी मोठ्या दिमाखात संसदेत पंतप्रधानांच्या भाषणाला हजर होते. पण कोणत्याही आंदोलकांपुढे आपण झुकणार नाही अशी मोदींच्या काळातील या नव्या भाजपची गुर्मी आहे. पूर्वी शेतकऱ्यांच्या आंदोलनात याचा प्रत्यय आला होता. या आंदोलकांचा प्रभाव निवडणुकीच्या मतांवर पडणार नाही अशी भाजपला खात्री आहे. ती खरी असो की नसो. पण भाजपचे हे वागणे म्हणजे निव्वळ बहुमतशाहीचा माज आहे. एकीकडे भारत हा लोकशाहीची माता असल्याचं म्हणायचं. जगातला सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून मिरवायचं. आणि, दुसरीकडे लोकशाहीच्या साध्या तत्वांनाही चिरडून टाकायचं अशी ही भाजपची दुटप्पी नीत आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे होते की त्यांना विश्वासात घेऊनच शेती कायद्यांमध्ये बदल करावेत. खेळाडूंचे म्हणणे आहे की, सिंग यांना कुस्तीगीर परिषदेतून दूर करून त्यांच्याविरुद्धच्या आरोपांची चौकशी व्हावी. या दोन्ही मागण्या अत्यंत रास्त होत्या व आहेत. आंदोलकांची ताकद कितीही कमी किंवा जास्त असली तरी मागण्या न्याय्य असतील तर कायद्याच्या चौकटीत राहून त्या मान्य करणे हाच लोकशाहीचा पाया आहे. पण मोदींच्या भाजपला असे विरोधाचे आवाज ऐकायला आवडत नाहीत. त्यामुळेच खेळाडूंवर दिवसाढवळ्या कारवाईचा बुलडोझर चालवला जातो. रविवारी हे कुस्तीपटू संसदेवरील मोर्चा काढू इच्छित होते. त्यामुळे समजा कारवाई अनिवार्य होती असे मानले तरी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या खेळाडूंना प्रतीकात्मक निषेध करू देऊन शांतपणे ताब्यात घेता येऊ शकले असते. प्रत्यक्षात त्यांना गुन्हेगारांसारखी वागणूक दिली गेली आणि त्यांचे जंतरमंतरवरील तंबूही उखडण्यात आले. दहा वर्षांपूर्वी याच मैदानात अण्णा हजारे यांनी केलेल्या आंदोलनाला भाजपने रसद पुरवली होती व त्याचा पुरेपूर फायदा उठवला होता. आता सत्तेत आल्यानंतर त्यांना विरोधाचा थोडाही आवाज सहन होईनासा झाला आहे. इतर क्रीडापटू आणि मिडिया हेदेखील भाजपला सवाल न करता गप्प आहेत ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे.

विचार

मोदींच्या नऊ वर्षाचा हिशेब

नरेंद्र मोदी यांच्या सरकारला नऊ वर्षे पूर्ण झाली आहेत. या वर्षांचा हिशेब मागणारे हे काही प्रश्न.

सौमित्र रॉय

छत्तीसगडमधील सामाजिक कार्यकर्ते आणि आरटीआय कार्यकर्ते कुणाल शुक्ला यांनी नरेंद्र मोदींच्या ९ वर्षांच्या विनाशकारी शासनाबद्दल एक खुले पत्र लिहिले आहे. पत्रात त्यांनी ५० प्रश्न विचारले आहेत, ज्यांचे उत्तर व्हॉट्सप विद्यापीठाकडेही नाही .त्यांनी पत्रकार परिषद घेऊन पंतप्रधानांकडून उत्तर मागितले आहे. ही एक अशक्य गोष्ट आहे ! तरीही प्रश्न पहा, तपासून पहा आणि विनाशाच्या दरम्यान प्रचार समजून घ्या :

१- स्मार्ट सिटी बनलेल्या ९ शहरांची नावे सांगा?

२- आदर्श गाव बनण्यासाठी खासदारांनी दत्तक घेतलेल्या ९ गावांची नावे सांगा ?

३-९ जिल्ह्यांची नावे सांगा जिथे प्रत्येक घरात शौचालय आहे ?

४- नवीन रुग्णालय सुरू असलेल्या ९ जिल्ह्यांची नावे सांगा?

५- त्या ९ राज्यांची नावे सांगा जिथे १०० किमीचा रस्ता बांधला गेला ?

६. ९ बँक शाखांची नावे सांगा जिथे सर्व जन धन खाती जिवंत (चालू)आहेत ?

७- अशा ९ देशांची नावे सांगा जिथून भारतात गुंतवणूक येत आहे ?

८- अशी ९ क्षेत्रे सांगा जिथे १ लाख नोकऱ्या दिल्या आहेत ?

९-९ राज्ये सांगा जिथे नवीन वीज निर्मिती प्रकल्प उभारले आहेत ?

१०- तुमच्या मंत्रिमंडळातील ९ मंत्र्यांची नावे सांगा ज्यांची मुले सरकारी शाळेत शिकतात ?

११- अशा ९ शहरांची नावे सांगा जी पूर्वीपेक्षा अधिक स्वच्छ झाली आहेत ?

१२- अशी ९ राज्ये सांगा जिथे शेतकरी आधी आत्महत्या करायचे, आता ते करत नाहीत?

१३- मला सांगा फक्त ९ किमी एवढा परिसर दाखवा जिथे गंगा स्वच्छ झाली ?

१४- अशा ९ भाजप लोकांची नावे सांगा ज्यांच्या घरावर ईडी ,आयटीने छापे टाकले आणि त्यांच्याकडून काळा पैसा जप्त करण्यात आला ?

१५- तुरुंगात पाठवलेल्या भाजपच्या ९ बलात्कारांची नावे सांगा ?

१६.९ राज्यांची नावे सांगा ज्यांच्या गावांमध्ये पूर्ण विद्युतीकरण झाले आहे ?

१७- अशा ९ जिल्ह्यांची नावे सांगा ज्यामध्ये नवीन सिंचन योजनांचे बांधकाम सुरू झाले ?

१८- अशा ९ रुग्णालयांची नावे सांगा जिथे १०० नवीन डॉक्टर्स देण्यात आले आहेत?

१९- मला असे ९ विभाग सांगा जिथे भ्रष्टाचार समाप्त झाला आहे?

२०- ज्यांच्यावर कोणताही डाग नाही अशा भाजपच्या ९ खासदार किंवा आमदारांची नावे सांगा?

२१- अशा ९ शहरांची नावे सांगा जिथे महिला सुरक्षित आहेत ?

२२- या ९ वर्षातील कोणतेही ९ आठवडे मोजा जेव्हा दहशतीची कोणतीही घटना घडली नाही ?

२३- मला सांगा की या ९ वर्षातील कोणतेही ९ महिने जेव्हा बलात्काराची एकही घटना घडली नाही ?

२४- मला अशी ९ राज्ये सांगा जिथे या ९ वर्षांत अल्पसंख्याकांवर अत्याचार झाले नाहीत ?

२५- अशा ९ महिलांची नावे सांगा ज्यांना शून्य रुपयात स्वयंपाकाचा गॅस देण्यात आला आहे?

२६- अशा ९ खाद्यपदार्थांची नावे सांगा ज्यांच्या किंमती वाढल्या नाहीत ?

२७- अशा ९ राज्यांची नावे सांगा जिथे नवीन हवाई पट्टी बांधली गेली आहे ?

२८- देशाचा पैसा घेऊन परदेशात पळून गेलेल्या ९ थकबाकीदारांची नावे सांगा, की ज्यांना पकडून देशात परत आणले आहे ?

२९-देशातील सरकारी संपत्ती लूटत आहेत कोट्यधीश. अशी ९ नावे सांगा ज्यांच्याशी तुमचे संबंध नाहीत?

३०- मला सांगा भाजपचे ९ खासदार आणि आमदार ज्यांना नोटाबंदीच्या काळात तासनतास रांगेत उभे राहावे लागले?

३१- असे ९ एटीएम सांगा कुठे महिनाभर पैसे राहतात?

३२- मला सांगा असे ९ महिने ज्यावेळी सीमेवर गोळीबार झाला नाही?

३३- भाजपच्या अशा ९ प्रवक्त्यांची नावे सांगा जे खोट्या अफवा पसरवत नाहीत?

३४- ९ वर्षांत संसदेची अशी ९ अधिवेशने कोणती कामे झाली ते सांगा ?

३५- ९ केंद्रीय मंत्र्यांची नावे सांगा जे त्यांच्या मंत्रालयाचे निर्णय स्वतः घेतात ?

३६- अशा ९ उत्पादन क्षेत्रांची नावे सांगा ज्यात निर्यात वाढली आहे ?

३७- देशातील ९ विधानसभेची नावे सांगा जिथे केंद्रीय मंत्री निवडणूक प्रचारासाठी पाठवले गेले नाहीत ?

३८- ९ दिवस सांगा जेव्हा तुम्ही (पंतप्रधान) ९ पेक्षा कमी वेळा कपडे बदलले नाहीत ?

३९- तुमची (पंतप्रधान) अशी ९ भाषणे सांगा ज्यात १० पेक्षा कमी खोटे बोलले गेले ?

४०- पंतप्रधानांच्या अशा ९ परदेश दौरे सांगा ज्यात देशाचा एक कोटीपेक्षा कमी खर्च झाला आहे?

४१- तुम्ही (पंतप्रधान) अशा ९ निवडणूक रॅली सांगू शकाल का ज्यात करोडो रुपये खर्च झाले नाहीत?

४२- ९ महिने सांगा ज्यावेळी पेट्रोल डिझेलचे दर कधी वाढले नाहीत ते सांगा!

४३- भाजपच्या अशा ९ खासदार आणि आमदारांची नावे सांगा जे हिंसा, द्वेष आणि जातीयवाद पसरवण्याचे काम करत नाहीत.

४४- तुमच्या जाहीरनाम्यात ९ वर्षांपूर्वी दिलेल्या आश्वासनांपैकी कोणतीही ९ कामे पूर्ण झाली आहेत याची मोजणी करा.

४५- कोणाची जबाबदारी निश्चित आहे अशा ९ केंद्रीय मंत्र्यांची नावे सांगा?

४६-अशी ९ राज्ये सांगा जिथे भाजपने घराणेशाहीच्या आधारे खासदार आणि आमदारांना तिकीट दिले नाही.

४७- पंतप्रधान, तुमची अशी ९ भाषणे सांगा ज्यात तुम्ही चीनला आव्हान दिले आहे .

४८- अशी ९ राज्ये सांगा जिथे भाजपने कोट्यवधी देऊन आमदार विकत घेतले नाहीत .

४९- नवीन धरणे बांधण्यात आलेल्या कोणत्याही ९ राज्यांची नावे सांगा.

५०- अश्या ९ राज्यांची नावे सांगा जिथे पंतप्रधानांनी निवडणूक प्रचारादरम्यान केवळ विकासाच्या नावावर मते मागितली.

२०१४ मध्ये सत्तेवर आल्यानंतरच्या ४१ महिन्यांत नरेंद्र मोदी यांनी ७७५ भाषणे ठोकली. त्यानंतरच्या जवळपास सहा वर्षांत १५०० भाषणे झाली असावीत. एकूण आकडा २२०० वर नक्कीच गेला असेल... लाल किल्ल्यावरून सर्वात प्रदीर्घ भाषण करण्याचा विक्रमही त्यांनी नोंदवला आहे. असा भाषणजीवी पंतप्रधान मिळणे ही १४० कोटी भारतीयांसाठी नक्कीच अभिमानाची गोष्ट आहे. आचार्य अत्रेंच्या शैलीत सांगायचे तर, दहा हजार वर्षांत असा पंतप्रधान झाला नाही!काल विश्वगुरूंचे महाराष्ट्रातील दोन पट्टशिष्यदेखील त्यांचे नव्या संसदेतील भाषण ऐकण्यासाठी आणि त्यांचे विचार कर्णसंपुटात साठवण्यासाठी तेथे हजर होते. करोडो महाराष्ट्रीय जनतेसाठी ही भाग्याचीच गोष्ट. असो. एक भारत श्रेष्ठ भारत!

- हेमंत देसाई

आजकाल

कसं काय पाटील बरं हाय का?

संजय कामनगावकर

पाटील हा शब्द द्राविडी भाषेतील आहे. पट्टा म्हणजे जमीनीचा तुकडा. त्यावर आकारलेला सरकारी महसुली कर म्हणजे पट्टी. जमीनीची प्रतवारी ठरवून पट्टीचा हिशेब ठेवणारा तो पटवारी. पट्टी वसूल करणारा अधिकारी तो पट्टईल. पट्टईल पासून पाटील, पटेल अशी रुपं तयार झाली. सातवाहन काळापासून इतिहासात पट्टईल हा गावचा कारभारी म्हणून दिसू लागतो. पाटील ही पदवी कुणा एका विशिष्ट जातीची मक्तेदारी नाही. माझ्या माहितीप्रमाणे कुणबी/मराठा, ब्राह्मण, कायस्थ, धनगर, हटकर, महार, जैन, लिंगायत, मुसलमान या सर्व जातीच्या, धर्माच्या लोकांत पाटीलकी होतीच. महाराष्ट्रात किमान दोन हजार वर्षांपासून गाव गाड्यांचा केंद्रबिंदू पाटीलच आहे. या दोन हजार वर्षांत पाटलांनी ओसाड आणि वैराण गावांची लावणी-संचणी केली. बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदार सर्वांना पोटास लावणे हाच आपला धर्म मानला. रामायणातून हनुमानाचं पात्र काढलं तर रामायणात काहीच शिल्लक राहत नाही; तसंच गावातून पाटील वजा केला तर गावाचं गावपण शिल्लक राहत नाही.

पण आज मराठी सिनेमावाल्यांनी हेतुपुरस्सर 'पाटील' शब्द बदनाम केला. या आरोपात तथ्य आहे. पाटील म्हणजे नाचगाणी, तमाशा,फेटा आणि नोटांची उधळण अशी प्रतिमा तयार केली गेली. त्यासाठी हातचलाखी करत नाटकं,सिनेमांचा वापर केला. या क्षेत्रातील मंडळींनी सत्तर वर्षे खेड्यातील सहजीवनाची प्रतिमा नासवली. त्या सहजीवनाचा आधारस्तंभ पाटील हाच होता. त्यातल्या त्यात निळू फुलेंसारख्या अभिनेत्यांनी आपल्या अर्धवट समाजवादी आकलनातून पाटलांच्या प्रतिमेचा वर्षानुवर्षे खून केला. थर्डक्लास मराठी सिनेमा बनवायचा, त्याला मिळणारं सरकारी अनुदान लाटायचं, त्या सरकारी अनुदानातून पाटलांचं चारित्र्यहनन करत रहायचं हा आमच्या मराठी सिनुमावाल्यांचा आवडता उद्योग! यांच्या सिनेमातील नायक कोण! तर इन्स्पेक्टर पांडे!(सलमान)! नाहीतर एखादा कोकणस्थ! सिनेमाची नायिका कोण? तर लक्ष्मी जोशी(प्रतिघात)! पण यांच्या सिनेमातील खलनायक कोण?तर पाटील म्हणजे खलनायक! बैलांच्या शर्यती लावणारा, तमाशा बघणारा, लावणीवर पैसे उधळणार, ग्रामपंचायत निवडणुकीत गुंडागर्दी करणारा आणि भावभावकीचे खून पाडणारा असा पाटील हा हेतुपुरस्सर रंगवला गेला. त्यासाठी 'कसं काय पाटील बरं हाय का? काल काय ऐकलं ते खरं हाय का?' अशा तमाशाला जाऊन जत्रंत पैशाचं पाकीट हरवून बसणाऱ्या पाटलांची खिल्ली उडवणारी गाणी लिहिली गेली. हेच विषारी बीयाणं नकळतपणे रुजवलं गेलं. खेडोपाडी रुजलेलं बहुजनांचं नेतृत्व असं शिताफीनं संपवलं गेलं. अशाच निर्माता दिग्दर्शकांना पुरस्कार वाटले गेले. हे सर्व सोपस्कार सरकारी अनुदानातून पार पडले. जेव्हा बहुजनांतील थोड्या फार लोकांना हा कावा ध्यानात येऊ लागला, तोपर्यंत वेळ निघून गेली होती..

आज सर्व जाती धर्मातील पाटलांच्या हलाखीच्या परिस्थितीला कोण कारणीभूत आहे? तर पाटील स्वतः! कारण पाटील बेसावध राहिला. पाटलांच्या पोरांनी आपल्या बापजाद्यांची बदनामी पचवली. पाटील निस्तेज दिसू लागला.

आता या पाटलांचं करायचं काय?

गावोगावी पाटलांची बेरोजगार पोरं शेकड्यांनी पडून आहेत. यांच्या कडं व्यवसाय कौशल्याचा अभाव आहे. आता जमीनदारी उध्वस्त झालीय. गाठीला कवडी नाही. व्यसनाधीनता वाढलीय. पण एक गोष्ट मात्र नक्की आहे. पस्तीस हजार गावखेड्यांतील एकाही पाटलाचं एकही पोरगं देशद्रोही, गद्दार निघालं नाही. एकानंही परदेशी गुप्तहेर संघटनांशी जवळीक साधून दमडी कमवण्याचा नाद केला नाही. तमाशा बघितलाच नाही असं नाही, तो नाद एखाददुसऱ्यानं केलाही असंल, पण पाकिस्तानी बायकांच्या नादी लागून देशाची महत्वाची माहिती अतिरेक्यांना पुरवली नाही. म्हणून, अजून खूप काही चांगलं घडू शकतं.

ही परिस्थिती बदलू शकते. त्यासाठी पाटलांच्या पोरांनी जातीयवादी कोणत्याही किड्यांना जवळ फिरकू देता कामा नये. व्हाट्सअप युनिव्हर्सिटीपासून लांब राहिलं पाहिजे. छोटेमोठे व्यवसाय सुरू करा. पेटवणाऱ्यांना ओळखायला शिका. लक्षात ठेवा, सुमारे दोन हजार वर्षांचा समृद्ध वारसा तुम्हाला लाभलाय. आपापसात भांडू नका. इतरांशी वादू नका. शांतपणे तुमची आर्थिक उन्नती करत रहा.

गौतमीनं पाटील आडनाव लावावं यात तुमचा काहीही कमीपणा नाही. एवढ्या लवकर शाहू महाराजांना विसरलात का? एखादी स्वतःला ९६ कुळी मराठा समजणारी भगिनी सुद्धा नृत्य करुन नावारुपाला येतेय तर पाठिंबा द्यायला शिका. तुमची शक्ती अशा क्षुद्र वादविवादात दवडू नये हीच अपेक्षा! एकदा का तुमची परिस्थिती बदलली की तुम्हीही छाती ठोकून सांगू शकता,व्हय जी, नावनं बेश्ट हाय बघा! समदं नादर चलालंय!

व्हायरल

सावरकरांचा सिनेमा आणि गांधी

'सावरकर' चित्रपटाच्या टीझरमध्ये गांधी अहिंसेवर अडून बसले नसते तर भारत ३५ वर्षं आधी स्वतंत्र झाला असता असा उल्लेख केला आहे. ('गांधीजी बुरे नहीं थे' असं प्रशस्तीपत्रही दिलं आहे). सावरकरांची कथा (ती कितपत खरी आहे हे चित्रपट पाहिल्यावर कळेलच) सांगणाऱ्या चित्रपटाच्या एक मिनिटाच्या टीझरमध्ये गांधी आणावे लागतात हा एक नोंद घ्यावा असा मुद्दा आहे. पण तो बाजूला ठेवला तर प्रश्न असा पडतो की गांधी दक्षिण आफ्रिकेहून भारतात आले १९१५ मध्ये. चंपारणचा पहिला अहिंसात्मक लढा झाला १९१७ मध्ये. ३५ वर्षांच्या हिशेबाने चित्रपटातील दाव्यानुसार १९४७ ऐवजी १९१२ मध्ये स्वातंत्र्य मिळायला हवं होतं. १९१२ मध्ये गांधी जर भारतातच नव्हते आणि अहिंसात्मक लढा सुरूच झाला नव्हता तर मग १९१२ मध्ये स्वातंत्र्य मिळालं नसेल तर त्यासाठी गांधींना कसं काय जबाबदार धरता येईल काही कळलं नाही.

अर्थात असं विचारणं चूक आहे याची मला कल्पना आहे. भारताचं जे जे वाईट झालं त्याची जबाबदारी गांधी आणि नेहरू यांच्याकडे आपोआपच, बाय डिफॉल्ट जाते. त्याकरता कुठल्याही विश्लेषणाची गरज नसते. आणि जे चांगलं झालं त्याची जबाबदारी कुणाकडे जाते त्यांचं नाव सांगायची गरज नाही. ते नाव १४० कोटी भारतीयांच्या मनावर व्हॉट्सप फॉरवर्ड्सद्वारे केव्हाच कोरलं गेलं आहे.

पण तरी वरील प्रश्न पडला खरा. विचारण्याचे औद्धत्य केल्यास तो देशद्रोह ठरणार नाही अशी माफक अपेक्षा आहे.

शिवाय सावरकरांनी भगतसिंग आणि सुभाषचंद्र बोस यांना प्रेरणा दिल्याचं टीझरच्या अखेरीस म्हटलं आहे. ते वाचून गदगदून आलं. सावरकरांनी प्रेरणा देऊनही भगतसिंगने स्वतःला कम्युनिस्ट म्हणून आयडेंटिफाय करणं आणि सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद फौजेतील तुकडीला सावरकरांचं नाव न देता गांधींचं नाव देणं याची काय टोटल लागली नाही. पण असो. काहीतरी मास्टरस्ट्रोक असेल. आपल्याला काय माहीत? त्यामुळे आपण मौनात जाणं उत्तम!

- उत्पल वबा

ती सध्या कुठे असते?

या देशातल्या सुशिक्षित अशा डॉक्टर, इंजिनीयर, सीए, प्राध्यापिका, शिक्षिका, पायलट, आयएएस, आयपीएस, एमपीएससी वगैरे झालेल्या बाया सध्या कुठे असतात?

त्यांना ब्रिजभूषण दिसत नाही, त्यांना आसाराम बापू दिसत नाही, बिल्कीस बानोच्या बलात्कारांचे तुरुंगातून बाहेर पडताच केले जाणारे भव्य सत्कार दिसत नाहीत, स्त्री खेळाडूंना फरफटत नेणारे पोलीस दिसत नाहीत, निष्कारण जेलमध्ये सडत ठेवलेल्या संजीव भटच्या बायकोचा आक्रोश दिसत नाही, रोहित वेमुलाची टाहो फोडणारी आई दिसत नाही,

गोसाव्यांच्याही शेवटी उभी केलेली देशाची अर्थमंत्री आणि कार्यक्रमालाही न बोलावलेल्या राष्ट्रपतीही यांना दिसत नाहीत?

स्त्री मुक्ती आणि पुरोगामी चळवळीतील आमच्या ताया सोडल्या तर वर उल्लेखिलेल्या या तमाम उच्चशिक्षित बाया सध्या कुठे असतात आणि काय करतात?

पुरूषांपेक्षा बाया सहृदय आणि संवेदनशील असतात असं आम्ही लहानपणापासून ऐकत आलो, मत त्यांच्यातलं ते संवेदनशील बाईपण कोणी संपवलं? सध्या त्या कुठे असतात?

देशात पन्नास टक्के महिला आहेत हे खरं आहे का? की ती पण सरकारी खोटी आकडेवारी?

महत्वाचा प्रश्न हा आहे ती सध्या कुठे असते आणि काय करते?

- विश्वंभर चौधरी

लोकसंसद

पादचाऱ्यांचे मरण

महामार्ग पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार राज्यात २०१९ ते २०२२ या चार वर्षांत रस्ते अपघातामध्ये १० हजार ६३४ पादचाऱ्यांचा मृत्यू झाल्याचे वास्तव समोर आले आहे. राज्यातील वाहनांची वाढती संख्या आणि त्यामुळे अपघातांची संख्याही दिवसागणिक वाढत आहे. पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना करूनही रस्ते अपघातातील मृत्यूचे प्रमाण कमी झालेले नाही. राज्यातील सुमारे तीन लाख २४ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांवर दरवर्षी अंदाजे ३० ते ३३ हजार अपघात घडतात आणि यामध्ये दोन हजारांपेक्षा अधिक पादचाऱ्यांसह सरासरी १२ ते १४ हजार नागरिकांचा नाहक मृत्यू होतो. वास्तविक जागतिक पातळीवर रस्ते बनवताना पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले जाते. मात्र आपल्याकडे पादचाऱ्यांची सुरक्षितता पायदळी तुडविली जाते. मुंबई-पुण्यासारख्या महानगरातील पदपथ म्हणजे 'शोधा म्हणजे सापडेल' अशा दुरावस्थेत आहेत. पदपथांवर दुकानदारांनी, फेरीवाल्यांनी, खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी अतिक्रमण केलेले आहे. काही ठिकाणी पदपथांवर वाहनांची पार्किंग केली जाते. सर्वत्रच पदपथांची अशी महाभयंकर परिस्थिती आहे.

- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी

प्रेरणा

ध्यान करण्याची जागा

नव्या मठाची कीर्ती राजाच्या कानावर गेली. तिथे ध्यानाचे अपूर्व प्रयोग चालतात, असं त्याला समजलं.

राजा महंतांकडे आला. म्हणाला, मला तुमचा मठ पाहायचाय.

महंत त्याला घेऊन निघाले, हे स्वयंपाकघर. हा भिक्षुंचा निवास. हे भोजनगृह. हे अतिथीगृह...

महंत एकेक वास्तू दाखवत होते, तसतशी राजाची अस्वस्थता वाढत चालली होती. त्याचं सगळं लक्ष मठाच्या मधोमध असलेल्या एका वास्तूकडे लागलं होतं... ते काय आहे, तिथे काय घडतं, तिथे काय करतात, असं तो सारखा विचारत होता आणि महंत त्याकडे दुर्लक्ष करून इतर वास्तूंची माहिती देत होता...

राजा वैतागला. महंतांना म्हणाला, हे असं गोलगोल फिरवणं थांबवा... मला सरळ उत्तर द्या... तुमच्या या बाकीच्या मठात मला काडीचाही रस नाही... तुमच्या मठात ध्यान कुठे करतात ते दाखवा... मी मघापासून विचारतोय, त्याच ठिकाणी तुम्ही ध्यान करता ना?

महंत हसून म्हणाले, महाराज, तुम्ही आल्यापासून या मठात कुठे काय केलं जातं, याच्याचसंदर्भात विचारणा करताय. त्यामुळे जिथे काही केलं जातं, तेच मी तुम्हाला दाखवतोय... ते ध्यानमंदिर आहे, हे खरंच आहे... पण ती काही 'करण्याची' जागा नाही... तिथे आम्ही ध्यान 'करत' नाही... कुठेही ध्यान 'करता येत' नाही... अमुक ठिकाणी बसलं आणि ध्यान 'करायला' सुरुवात केली, असं होत नाही... ध्यानमंदिर ही काहीही न करण्याची जागा आहे... ज्याला काहीही न करणं साधतं, त्यालाच ध्यान साधतं... ध्यान होतं...

ओशो

निवडक

रिक्षाची चोरी

पनवेल : घरासमोर उभी केलेली रिक्षा रात्रीच्या वेळी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना पनवेल शहरातील तक्का गावात घडली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्कागाव येथे राहणाऱ्या गणेश सुतार यांनी त्यांची रिक्षा एमएच ४६ एझेड ९१४२ घरासमोर नेहमीच्या जागेवर उभी केलेली अज्ञात रिक्षा चोरट्यांनी पळवून नेली आहे. रिक्षा जागेवर दिसली नसल्यामुळे त्यांनी सर्वत्र रिक्षेचा शोध घेतला परंतु रिक्षा सापडली नाही.

नवजीवनची वार्षिक सभा

खांब : नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा (ता.२९) रोजी संस्थेचे चेअरमन महेंद्र पोटफोडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सर्वसाधारण सभेप्रसंगी राम कापसे, धोंडू कचरे, रामचंद्र चितळकर, प्रकाश थिटे, शंकर म्हसकर, राम मरवडे, बाबूराव बामणे, भाई पोटफोडे, बाळाराम धामणसे, नंदकुमार कापसे, मारूती खांडेकर, शिवराम महाबळे, संजय शेळके, सागर मोरे, यांच्यासह मोठ्या संख्येने सदस्य उपस्थित होते.

लॅपटॉपची चोरी

पनवेल : टेबलावर ठेवलेले ४७ हजार रुपयांचे २ लॅपटॉप अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. बेलपाडा, सेक्टर तीन, खारघर येथील अमित कुमार सैनी व त्यांचा मित्र आदर्श कुमार हे दोघे वॉकिंगसाठी खारघर हिल येथे गेले. त्यांना रूममध्ये भेटण्यासाठी आलेला मित्र विवेक कुमार हा एकटाच झोपला होता. त्यामुळे त्यांनी रूमचा दरवाजा उघडा ठेवून ते वॉकिंगसाठी गेले. वॉकिंगसाठी जाऊन ते दोघे परत आले. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

तरूणी बेपत्ता

पनवेल : पनवेल बसस्थानकातून बेपत्ता झाल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. या तरुणीचा कसून शोध पोलीस करीत आहेत. रोहिणी दत्तात्रय कोळी असे या तरुणीचे नाव असून तिचे वय २३ वर्षे, उंची ५ फुट, वर्ण सावळा, बांधा सडपातळ, चेहरा गोल, नाक सरळ व लांब, केस काळे असे तिचे वर्णन आहे. या तरुणीबाबत कोणास काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी क्र ०२२-२७४५२३३३ किंवा पोलीस हवालदार बोरसे यांच्याशी संपर्क साधावा.

आरोग्याच्या तक्रारी

पनवेल : शहराचे तापमान गेल्या काही दिवसांपासून ४० अंशांच्या घरात आहे. सततच्या तापमानवाढीचा आरोग्यावर परिणाम होत असल्याने खोकला, चक्कर, डोकेदुखी, कमी रक्तदाब, उष्माघात, तसेच पोटाचे विकार वाढले आहेत. उन्हाचा तडाखा वाढू लागल्याने घशाला पडणारी कोरड टाळण्यासाठी सध्या रस्त्यावरचे ज्यूस, फळे, बर्फाचे गोळे, कुल्फी खाणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. या विक्रेत्यांकडून वापरले जाणारे दूषित पाणी पोटाच्या तक्रारीसाठी निमित्त ठरत आहे.

दिन वार्ता

पंचांग

३१ मे २०२३, गुरुवार
विक्रम संवत२- २०७९
ज्येष्ठ शके संवत२- १९४५
संवत्सर शोभननाम
अयन- उत्तरायण, मास- ज्येष्ठ, ऋतु- ग्रीष्म
शुक्ल पक्ष, तिथि : एकादशी १३:४६:१८
नक्षत्र : हस्त ०६:००:०९
योग : व्यतीपात २०:१४:४६
करण : विष्टि १३:४६:१८
करण : बव २५:४८:३६+
सूर्य : वृषभ
चन्द्र : तुला१८:२९:५०
हिजरी सन२ - १४४४
मुस्लिम मास - जिल्काद
तारीख - ११
विशेष
निर्जला एकादशी
अहिल्याबाई होळकर जयंती

सुडोकू

7						3		
			9	3	7	5	2	6
		2			1			
2	8		7					
6	4	1				8	7	2
					8		5	1
			8			2		
8	2	6	3	4	5			
		3						4

मंगळवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर

2	1	9	3	7	8	4	6	5
7	6	8	5	2	4	1	3	9
4	3	5	1	9	6	8	7	2
1	2	6	4	3	5	9	8	7
9	5	4	6	8	7	3	2	1
3	8	7	2	1	9	5	4	6
6	4	2	8	5	1	7	9	3
8	7	1	9	6	3	2	5	4
5	9	3	7	4	2	6	1	8

भूमिहीनांना मिळणार हक्काची जमीन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अनुसूचित जाती, नवबौध्द घटकातील भूमिहीन शेतकऱ्यांना जमीन मिळावी यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान सबलीकरण योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेसाठी ३० जणांनी प्रस्ताव सादर केले आहे. दुसऱ्यांच्या शेतात जाऊन मोलमजूरी करणाऱ्या भूमिहीन शेतकऱ्यांना स्वतःच्या हक्काची जमीन देऊन त्यांचे स्वाभिमान व सबलीकरण उंचावण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

तीस जणांचे प्रस्ताव सादर

वाढत्या औद्योगिकीकरणाबरोबरच नागरिकीकरणामुळे शेतीचे क्षेत्र दिवसेंदिवस कमी होऊ लागले आहे. शेतीतून उत्पन्न कमी मिळत असल्याने अनेक तरुणांनी भातशेतीकडे पाठ फिरवली आहे. त्याचा परिणाम शेती क्षेत्रावर होत आहे.

शेतीचे क्षेत्र वाढण्याबरोबरच अनुसूचित जाती, नवबौद्ध समाजातील नागरिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने अनुसूचित जाती, नवबौद्ध समाजातील नागरिकांना शेती देण्याचा निर्णय घेतला आहे. जे शेतकरी भूमिहीन आहेत, अशा शेतकऱ्यांना शेती देऊन त्यांच्यामार्फत वेगवेगळ्या पिकांची लागवड करणे. त्यातून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या उत्पन्नातून आर्थिक बळ देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील भूमिहीन शेतकऱ्यांना शेती देऊन त्यांचा सर्वांगिण विकास साधण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबलीकरण योजना सुरु करण्यात आली आहे.

भूमिहीन असलेल्या शेतकऱ्यांना सरकारकडून शंभर टक्के अनुदानातून जमीन दिली जाणार आहे. प्रत्येक तालुक्यातील गावांमधील लाभार्थ्यांना प्राधान्याने जमीन देण्यात येणार आहे. भूमिहीन शेतकऱ्यांकडून अर्ज प्राप्त झाल्यास शासनाकडून जमीन खरेदी करून ती जमीन भूमिहीन शेतकऱ्यांना वाटप केली जाणार आहे. या योजनेला रायगड जिल्ह्यातून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

जिल्ह्यातील ३० भूमीहीन शेतकऱ्यांनी जमीनीसाठी प्रस्ताव समाजकल्याण विभागाकडे पाठविला आहे. पडताळणी करून प्रत्येक शेतकऱ्यांना कोरडवाहू ४ एकर किंवा बागायत २ एकर जमीन दिली जाणार आहे.

त्यानुसार श्रीवर्धन तालुक्यातील १०५ एकर जमीन या शेतकऱ्यांना देण्याचे नियोजन केले आहे. रेडीरेकनर दराप्रमाणे ही जमीन भूमिहीन शेतकऱ्यांना दिली जाणार असल्याची माहिती समाजकल्याण विभागाकडून देण्यात आली आहे.

भूमिहिनांना जमीन मिळण्यास अडथळे

रायगड जिल्ह्यामध्ये जमिनीला मोठ्या प्रमाणात महत्व प्राप्त झाले आहेत. वेगवेगळे उद्योग धंदे, प्रकल्प उभारणीसाठी जमीन संपादीत करण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यात जिल्ह्यात वेगवेगळे धनदांडगे जिल्ह्यातील जमीनी घेण्यावर भर देत आहेत. जिल्ह्यातील जमीनीला सोन्यापेक्षाही महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे जमीनीच्या किंमती प्रचंड वाढू लागल्या आहेत. भूमिहीन शेतकऱ्यांना रेडीरेकनर दराने जमीनी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मात्र जमीनीच्या वाढत्या किंमतीमुळे रेडीरेकनर दराने जमीनी खरेदी करण्यास अडथळे निर्माण होत असल्याचे चित्र आहे.

योजनेसाठी लागणार ही दाखले

जातीचा दाखला सत्यप्रत, उत्पन्नाचा दाखला, भूमिहीन शेतमजूर असल्याचे प्रमाणपत्र, दारिद्र्यरेषेखालील असल्याचे प्रमाणपत्र, महिलांसाठी विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत असल्याचा दाखला, पतीच्या मृत्युचे प्रमाणपत्र किंवा प्रतिज्ञापत्र, रहिवासी दाखला, कितीवर्षे रहिवाशी आहेत याबाबत ग्रामसेवकांचे प्रमाणपत्र, रेशनकार्ड झेरॉक्स सत्यप्रत, वयाबाबतचा पुरावा, शाळा सोडल्याचा दाखला, निवडणूक प्रमाणपत्र, महसूल व वन विभागाने गायरान व सिलींगच्या जमिनीचे वाटप केले नाही याबाबत प्रतिज्ञापत्र.

माणगावमध्ये विविध दाखल्यांचे वाटप

। माणगाव । वार्ताहर ।

शासन आपल्या दारी या कार्यक्रमाअंतर्गत जिल्हाधिकारी यांच्या सुचनेनुसार व माणगांव उपविभागीय अधिकारी उमेश बिरारी व तहसीलदार विकास गारूडकर यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव मंडळ अधिकारी अर्जुन जमखंडी यांनी तालुक्यातील पळसगाव बुद्रुक, उतेखोल, माणगाव, बामणोली, होडगाव व सूरवतर्फे तळे या सहा तलाठी सजे मधून १२५७ विविध प्रकारचे दाखले शिबिरात लाभार्थांना दिले. विना विलंब, विना खर्च, विना हेलपाटे हे दाखले मिळाल्यामुळे खरोखरच शासन आपल्या दारी उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत केले.

तर पळसगाव बुद्रुक, उतेखोल, माणगाव, बामणोली, होडगाव व सूरव तर्फे तळे या सहा तलाठी सजेमधील सर्वसामान्य नागरीकांना लागणारे उत्पन्न दाखला, जातीचा दाखला, नॉन क्रीमिनीलीअर दाखला, रेशन कार्ड वाटप, ८ अ उतारा, ७/१२ उतारा, नव्याने आरस सुद्धा प्राप्त करण्यात आले, त्याचबरोबर विविध प्रकारचे दाखले देण्यात आले. तसेच शासकीय विविध योजनाबाबत नागरिकांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी माणगाव मंडळ अधिकारी, विलास मोराळे, प्रियंका सत्तेरे, निशिगंधा भारमल, आदी कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले.

उरणमध्ये मच्छीमार संघटनेची स्थापना

। उरण । वार्ताहर।

मच्छीमार बांधवांच्या विविध समस्या सोडविण्याच्या अनुषंगाने व मच्छीमार बांधवाना त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्याच्या उद्देशाने सी. आय.टि. यू या डाव्या विचाराच्या संघटनेतर्फे मंगळवार (दि. ६) रोजी मल्टीपर्पज हॉल जे. एन.पी. टी. टाउनशीप उरण येथे कोकण किनारा मच्छीमार संघटनेची स्थापना करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला अखिल भारतीय सी आय टी.यूचे अध्यक्ष कॉ. के हेमलता, सी आय टी यूचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ. डी. एल कराड, महाराष्ट्र राज्य जनरल सेक्रेटरी एम. एच.शेख, महाराष्ट्र राज्य सेक्रेटरी भूषण पाटील, फॉरवर्ड सिमेन्स यूनियनचे मनोज जाधव, जिल्हाध्यक्ष मधूसूदन म्हात्रे, रविंद्र पाटील, विनायक म्हात्रे, शुशिल देवरुखकर, के नारायणन, शशि यादव हे उपस्थित राहणार आहेत. तरी जास्तीत जास्त मच्छीमार बांधवांनी या नविन संघटनेच्या स्थापना सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन निमंत्रक संदिप पाटील, सुरेश कोळी, मारुती पाटील, दिलीप पाटील, काशिनाथ पाटील यांनी केले आहे.

भाऊसाहेब राऊत विद्यालयाचा १०० टक्के निकाल

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील कशेळे येथे असलेल्या आदीजन शिक्षण प्रसारक मंडळाच्या भाऊसाहेब राऊत कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे.

या विद्यालयातील कला शाखेत ज्योत्स्ना मंगल धुळे हि विद्यार्थिनी ८०.३३ टक्के गुण मिळवून पहिली आली आहे. त्याच विभागात रसिका तातुराम जाधव हि ७७ टक्के गुण मिळवून दुसरी आणि तेजस भास्कर माळी हा ७५. ६७ टक्के गुण मिळवून तिसरा आला आहे. वाणिज्य शाखेत वैष्णवी हसुराम जोगळे हि ८०.८३ टक्के गुण मिळवून पहिली तर नीलम मोहन माळी हि ७८.८३ टक्के गुण मिळवून दुसरी आणि साक्षी निवृत्तीची सावंत हि ७७.३३ टक्के गुण मिळवून तिसरी आली आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक एस ए प्रधान यांनी अभिनंदन केले आहे.

नेरळ विद्यामंदिर कनिष्ठ महाविद्यालयात मुलींची बाजी

। नेरळ । वार्ताहर ।

नेरळ विद्यामंदिर कनिष्ठ महाविद्यालयात कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखा असून या तिन्ही शाखांमधील बारावीच्या परीक्षेचा निकाल ९३.०२ टक्के इतका लागला आहे. कला शाखेत अश्विनी राजेंद्र तरे ७७.५० टक्के, कांचन चंद्रकांत पाटील ७६. ००, ममता बाळू गायकवाड ७४.१७ टक्के गुण मिळाले. कला शाखेचा एकूण निकाल ८७.५० टक्के लागला आहे. वाणिज्य शाखेत नाहिद नदीम खान ९० टक्के, प्रेक्षा संजय क्षीरसागर ८६.१७ टक्के, फातिमा इकबाल देशमुख हि ८५.५० टक्के गुण मिळाले. वाणिज्य शाखेचा एकूण निकाल ९४. ६७ टक्के लागला आहे. विज्ञान शाखेत सोनाली विजय कोंडिलकर ८९.५० टक्के, हर्ष अशोक पेमारे ८२ टक्के, साहिल भरात राणे ७४.८३ टक्के गुण मिळाले. विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९९. ०३ टक्के इतका लागला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्या मंदिर मंडळ दादर आणि मुख्याध्यापक यांनी अभिनंदन केले आहे.

भाऊसाहेब राऊत विद्यालय चिंचवली डिकसळला यश

नेरळ : कर्जत तालुक्यातील चिंचवली डिकसळ येथे असलेल्या भाऊसाहेब राऊत विद्यालय कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावी परीक्षेचा निकाल ८५ टक्के आहे. या कनिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेत आदित्य सत्यवान ठोंबरे हा विद्यार्थी ७०.८३ टक्के गुण मिळवून पहिला आला असून धनश्री संजय भगत हि दुसरी तर निकिता विजय शेंडे हि तिसरी आली असून कला शाखेचा एकूण निकाल ८० टक्के इतका लागला आहे.तर वाणिज्य शाखेचा एकूण निकाल ९० टक्के इतका लागला असून शामल सुरेश ठाकरे हि ६८.६७ टक्के गुण मिळवून पहिली आली असून पायल अजय कराळे हि ६७.६३ टक्के गुण मिळवून दुसरी आणि निखिल वासुदेव कोळंबे ६५.६७ टक्के गुण मिळवून तिसरी आली आहे.

शब्दकोडे क्र.१३९



आडवे शब्द :१. 'देवाचिये दारी उभा क्षणभरी....'६. मधल्या काळात१०. माजलेला११. तोंडदेखले१२. अंदाजे१४. चाबूक१६. घोटाळा१८. सुंदर अवयव१९. अधीन२०. डोंगराचा तुटलेला भाग२२. वास्तवता२३. नियम२५. उजेड२७. बालीश२९. आपुलकी, स्नेह३०. बिजली३१. एकाएकी३३. आईचे वडील३५. व्यवसाय३६. मजा३७. पावशेरच्या निम्म ा४०. धक्का४२. नालस्ती४३. गावाची वेस४५. चांदणी४७. म ोठा४९. स्वामी५१. धनलाभ५२. जंगली५३. आच, उष्णता५४. भावजय५६. विशेष५७. उद्यानंतरचा दिवस५८. पुरेसा५९.रक्षण करणारा६०. शर्त६१. नगरपालिकेमधील लोकप्रतिनिधी६५. निस्पृह६६. हत्ती६७. गाढव६९. जगबुडी७०. चोप७२. पांडवांचा नव्या राजधानीतील अद्भुत महाल७४. अनाठायी खर्च७५. संपर्कनि फैलावणारा आजार७८. सर्व उपाय खुंटल्याने निराश झालेला८१. विचित्र स्वभावाचा८२. स्वाभाविक ओढ८३. त्रास८४. पुष्कळ८६. तापलेला८७. मनन८८अ. नामघोष९१. सुयोग आहार९२. सरण९३. काळाचा परिणाम होत नाही असे९५. परके गाव९७. उकळी आलेले ९८. '--- काय अन२ फटाक्यात पाय'९९. नव्या नवतीच्या वयातील१००. ठिकठिकाणी

उभे शब्द:१. त्यावेळी२. लेप, वर्ख३. खार४. निष्पाप५. या ठिकाणी६. तीन देवतांचे एकरूप७. मांजराचे ओरडणे८. मृदू९. जाड दोर१०. कपाळभर लावलेले कुंकू१२. चालू१३. सत्ताविसावे नक्षत्र१५. भित्रा१७. अस्थैर्य१८. 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती, ---- -- ----'२१. भय२३. ढोंग२४. कर्ज घेणारा२५. जुगाराचा प्रकार२६. भांड्याला पडलेली 'खोक'२८. भांडणे लावणारा२९. लोखंड३१. विचित्र३२. नाथपंथातीलनऊ सिद्धपुरुष३३. आईची बहीण३४. पहिलवान३९. शत्रुत्व४१. अर्थ, सामर्थ्य४४. सागराच्या पोटातील अ३□४४५. उच्चभ्रू४६. पोटातील भुकेचा आवाज४८. लोभी४९. महिना५०. कारस्थान५५. ढग५६. टिकाऊ पोळीचा गुराथी प्रकार५८. शेपूट६०. सुरक्षिततेची खात्री देणे६२. दयामया६३. फौजेचा प्रमुख६४. परेड६६. गरजू६८. युद्ध६९. सकाळ७०. उपाय७१. भे७३. सैर७५. थोडक्यात७६. सात७७. जगरहाटी७९. लोखंडावरील गंज८०. धांदलीने, त्वरेने८१. वाटप करणारा८३. माळ८५. घोड्याचे प्रिय कडधान्य८७. काळजी८८. भूभागाचा आराखडा८९. सांभाळ, जपणूक९०. विविहितेच्या वडिलांचे घर९१अ. अखंड९२. कुस्तीत हरलेला९४. लत्ताप्रहार९५. स्नान (इंग्रजी)९६. उणे

शब्दकोडे क्र.१३८ चे उत्तर

आडवे उत्तर
१.बुडत्याचा पाय खोलात ६.करवत १०.कळ ११.बडबड १२.वाचाळ १३.भारत १४.लायक १६.रकाना १८.लाख२१. आस्था२२.मरगळ २४.काल २५.करंगळी २६.पान २७.वंग२८. वार२९.कमोद ३१.भात ३३.चाकर ३५.अथक ३७.कामगार ३८.निखारा ३९.आरसपान ४०.वारंवार ४१.मात्र ४२.गृहकलह ४५.रेचंदन ४८.देह ४९.हकनाक ५१.चर ५३.स्थलांतर५६. विमल५७.रमणी ५८.डर ५९.चकचकीत ६१.समान ६२.सगा ६३.शरम६४.लवकर ६६.गर ६८.चलन ७१.यम ७२.कानाडोळा करणे७४.रबडी ७५.नगर ७६.रजत

उभे उत्तर
१.बुडत्याला काडीचा आधार २.चाकरचुकर ३.पाळत४.खोकला ५.तबक ६.कबरस्थान ७.रडका ८.तवा ९.हळहळणे१५.यदा १७.नामवंत १९.खल २०.जगन्नाथ २१.आपादमस्तक२३. रग२८.वारस ३०.मोका ३१.भारवाहक ३२.वखार ३४.कर३५. अनमान ३६.कथा ३८.निवारक ४२.गृहस्थ ४३.लहर४४. तंतोतंत ४६.चंचल ४७.दर ५०.नाभिकमल ५२.नमन५४.लांडगा ५५.तर ५६.विद्यालय ५७.मामा ५९.चरचरीत ६०.कीर६१. सरकार ६२.सरकणे ६५.वमन ६६.गळा ६७.कणेर ६९.नरम ७०.तिडीक ७३.डोके

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

१. कै. श्री. चंद्रकांत क. पाटील, स्मरणार्थ अलिबाग



२. कै. श्री. सचिन पवार, स्मरणार्थ अलिबाग

महाविकास आघाडी सरकारचा विशेष निधी रद्द झाल्याने

निधीअभावी झुलता पूल, कुडपणचा विकास लटकला

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

महाविकास आघाडी सरकारने पोलादपूर तालुक्यातील पर्यटनासाठी विशेष निधीची तरतूद केली होती. मात्र नव्याने प्रस्थापित झालेल्या युती सरकारने या निधीला कात्री लावल्याने तालुक्यातील पर्यटनस्थळांचा विकास अधांतरीच लटकला आहे. परिणामी, वर्षा पर्यटनासाठी प्रसिध्द असलेल्या पोलादपूर तालुक्यात गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही वर्षा पर्यटनासाठी गर्दी होण्याची शक्यता कमी असल्याचे मत व्यक्त होत आहे.

पर्यटनस्थळांचा विकास अधांतरीच; झुलता पूल, कुडपण आदी स्थळांकडे दुर्लक्ष

पोलादपूर तालुक्यातील निसर्ग सौंदर्यसृष्टीचा २०२१ च्या अतिवृष्टी, महापूर आणि भूस्खंलनामध्ये ऱ्हास झाल्यानंतर महाविकास आघाडी सरकारच्या काळामध्ये विविध पर्यटनस्थळांच्या विकासकामासाठी पर्यटन विभागातर्फे तब्बल १० कोटी रूपयांचानिधी आगामी काळात खर्च करण्यास मंजूरी मिळाली.

या निधीतून घागरकोंडचा झुलता पूल, साखर येथील नरवीर सुर्याजी मालुसरे समाधी आणि उमरठ येथील नरवीर तानाजी मालुसरे यांच्या समाधीस्थळाचे सुशोभीकरण आदी विकासकामे करण्याची तयारी सुरू झाली. यानंतर ब्रिटीशकालीन हिलस्टेशन म्हणून प्रसिद्ध असलेल्या कुडपणच्या विकासासाठी तत्कालीन पर्यटन राज्यमंत्री अदिती तटकरे यांनी दौरा केला. मात्र, स्थानिक आमदार भरत गोगावले यांनी कुडपणला पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांना घेऊन जाण्याची घोषणा करून प्रत्यक्षात ती घोषणा कृतीत आणण्याऐवजी राज्यातील महाविकास आघाडी सरकारला पायउतार व्हावे लागेल, अशी तयारी केली.

पोलादपूर तालुक्यातील वाकण गोपाळवाडी येथील घागरकोंडकडे जाणाऱ्या रस्त्यावरील झुलता पूलाची २०१८ मध्ये दुरूस्ती केल्यानंतर २०२१ मध्ये हा झुलता पूल पुर्णपणे वाहून गेला. तो पुन्हा उभारण्याबाबत प्रस्तुत प्रतिनिधीने तत्कालीन राज्यमंत्री अदिती तटकरे यांना आवाहन केल्यानंतर निधी उपलब्ध झाल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली होती.

सद्यस्थितीत पोलादपूर तालुक्यातील झुलता पुलाच्या ठिकाणी केवळ दोन चौथरे असून कोणतेही अन्य अवशेष दिसून येत नाहीत. परिणामी, पुलाकडे जाणाऱ्या रस्त्यावरून महसुली कर्मचाऱ्यांच्या मेहेरबानीवर चालणाऱ्या, विटभट्ट्यांची वाहतूक करणाऱ्या डम्पर्सची येजा सातत्याने सुरू असते. यामुळे नजिकच्या काळात याठिकाणी पुन्हा झुलता पूल उभारण्यात न आल्यास अवैध उद्योगांना या परिसरामध्ये चालना मिळण्याची शक्यता दिसून येत आहे.

नि व ड क

घरफोड्यास अटक

पनवेल : पनवेल तालुक्यातील हेदूटणे येथील घरात चोरी करणाऱ्या चोराला पकडून रहिवाशांनी पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. या प्रकरणी चोराविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मोहम्मद अहसान मोहम्मद इसामोल सब्जी फरोज (२२) याने दिगंबर राधाकांत झा यांच्या राहत्या घराची बाथरूमची खिडकीची काच काढली आणि त्याद्वारे घरात प्रवेश करून पाच हजारांचा मोबाइल आणि दोन हजार १०० रुपये रोख रक्कम चोरी करून पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना नागरिकांनी पकडले.

रस्त्याची दुरूस्ती

रसायनी : स्टेट बँक ते मोहोपाडा येथील रस्त्याची दुरवस्था झाली असून सार्वजनिक बांधकाम खात्याने तातडीने या रस्त्याची दुरूस्ती करावी अशी मागणी कृष्णा पारंगे यांनी केली आहे. रसायनी स्टेट बँक ते मोहोपाडा या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून वाहन चालकांना वाहन चालविणे त्रासदायक होत आहे. यामुळे अनेकांना कंबरदुखीचा त्रास जाणवत आहे. तर खड्डे चुकविताना वाहनांना अपघात झाल्याने अनेकजण जखमी झाले आहेत.

विकासकामांचे लोकार्पण

खांब : रोहा तालुक्यातील नेहरू नगर-खैरवाडी ग्रा.पंचायत हद्दीतील विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्याचे आयोजन आ.अनिकेत तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पं.स.माजी सभापती मोतीराम तेलंगे, सुरेश महाबळे, प्रितम पाटील, राकेश शिंदे, जगन्नाथ धनावडे, चिंतामणी दळवी, मोतिराम दळवी, गंगाराम सरफळे, अविनाश पलंगे, महेंद्र वाचकवडे, गणेश वाचकवडे, निशिकांत पाटील, शंकर जाधव, राजेंद्र खैर, मंदा जाधव, महिला मंडळ तसेच तरूण मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहिल्याबाईं जयंती

म्हसळा : अहिल्याबाई होळकर यांची जयंती पंचायत समिती म्हसळाच्या सभागृहात साजरी करण्यात आली. गटविकास अधिकारी बापूसाहेब पोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्यक्रमास निवासी नायब तहसीलदार गणेश तेलंगे, माजी सभापती छाया म्हात्रे, पुरवठा अधिकारी भालेराव, सहाय्यक गटविकास अधिकारी मंगेश साळी, एकात्मिक बालप्रकल्प अधिकारी श्रीम.कलंबास्कर, विस्तार अधिकारी श्रीमती पालवे, ग्रामपंचायत विस्तार अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

पापड, कुरड्यांना मागणी

पनवेल : पावसाळ्यासाठी पापड शेवया कुरड्या लोणचे असे विविध पदार्थ बनवून ठेवले जातात. पण नोकरी करणाऱ्या किंवा ज्यांना स्वत: पापड, शेवया, कुरड्या बनवणे शक्य नाही, अशा महिला तयार वस्तु विकत घेतात. त्यामुळे हे पदार्थ बनवून विकणाऱ्या महिलांना आर्थिक आधार मिळत आहे. उन्हाळ्यामध्ये पापड, कुरड्या असे तयार केलेले हे पदार्थ बराच काळ टिकून राहतात. विविध प्रकारचे पापड, शेवया व कुरडया बनवून ग्राहकांपर्यंत पोचविणाऱ्या महिलांना या गृहउद्योगाने आर्थिक सक्षम बनवले आहे.

नदी शेजारी तरीही माणगावात पाणी संकट

। माणगाव । वार्ताहर ।

माणगाव नगरपंचायत हद्दीतील गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या जॅकवेलजवळ काळ नदीतील पाण्याची पातळी घसरल्याने नागरिकांतून भीतीचे वातावरण पसरले असून माणगावला भीषण पाणीटंचाईशी सामना करावा लागत आहे. काळनदी माणगावकरांच्या उशाला, कोरड पडली घशाला असी स्थिती सध्या दिसत आहे. काळ नदीवरील पाण्याचे नियोजन नगरपंचायतीने वेळीच केले असते तर नागरिकांना पाणी टंचाई कांही अंशी भासली नसती.

प्रचंड उष्णतेमुळे यंदा नदीतील पाण्याची पातळी दिवसेदिवस खालावत आहे. त्यामुळे नगरपंचायतीने एक दिवस आड करून पाणीपुरवठा करण्याचे ठरवले आहे. पाणी प्रश्न कधी सुटणार असे नागरिकांना वाटत आहे.

नगरपंचायतीत सन २०११ च्या जनगणनेनुसार १९ हजार लोकसंख्या आहे. १७ प्रभाग येत असून भादाव, जुने माणगाव, खांदाड, नाणोरे, उतेखोल, उतेखोलवाडी, दत्तनगर, साईनगर, क्रांतीनगर, आदर्श समतानगर, विरेश्वर नगर, विद्या नगर, बामणोली रोड, सिद्धी नगर, सुतारआळी, ढालघरफाटा, बाजारपेठ, मोर्बा रोड अशा विविध भागात दहा लाईनद्वारे नगरपंचायतीकडून पाणी पुरवठा केला जातो. सध्या काळ नदीवरील पाण्याची

जॅकवेल पडले कोरडे, एक दिवसआड पाणी

पातळी आटल्याने एक दिवस पाणी पुरवठा नगरपंचायतीकडून केला जात आहे. उतेखोल भागात काळ नदीवर जॅकवेल १९७२ साली अशोक साबळे हे सरपंच असताना बसवले होते. त्यावेळी ही योजना जीवन प्राधिकरणकडे होती. त्यानंतर माणगाव ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्यात आली त्यात वेळोवेळी सुधारणा करीत ही योजना वाढत्या लोकसंख्येनुसार कार्यान्वित करण्यात आली. सन २०१५ मध्ये ती माणगाव नगरपंचायतीचे ताब्यात आली.

अनेक भागात हे पाणी कमी दाबाने तर कांही भागात कमीच पाणी पडत आहे. त्यातच अनेक नागरिक नळाला पंप बसवून पाणी खेचत आहेत. त्यातच पातळी घटल्याने नागरिकांना या पाणी समस्येला तोंड द्यावे लागणार असूनही पाणी टंचाईचा फटका सहन करावा लागत आहे.

खोपोलीत पाळीव मांजराची नोंदणी

। अलिबाग । वार्ताहर ।

लायन्स क्लब ऑफ खोपोली आणि श्री कृपा क्रेरियम यांच्या माध्यमातून डॉ. रामहरी धोटे सभागृह लायन्स सर्व्हिस सेंटर येथे खोपोली शहरातील पाळीव मांजरांची नोंदणी शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी मांजरांच्या शरीरात १६ अंकी मायक्रोचीप बसवली गेली त्याच सोबत मांजरीची जात आणि मालकीचे प्रमाणपत्रही दिले गेले. मांजरांना अँटी रेबीज व्हॅक्सिनेशन देऊन तज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी केली गेली आणि मांजरांसाठी विविध प्रकारचे खाद्यपदार्थ आणि औषधे देखील भेट दाखल दिली गेली.

फेलाईन क्लब ऑफ इंडियाचे अध्यक्ष साकिब पठाण, विक्रांत देशमुख, शिल्पा मोदी, श्री कृपा क्रेरियम खोपोलीचे संचालक प्रवीण शेंद्रे, प्रवीण व्यास, उर्मिला पाटील, जितेंद्र शहा, संध्या कुलकर्णी, संदेश जाधव, गुरुनाथ साठेलकर, नवीन मोरे उपस्थित होते.

माथेरानमध्ये मे महिन्यात केवळ २९ लाखांचे उत्पन्न

। माथेरान । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील अग्रगण्य असलेले माथेरान पर्यटनस्थळ हळूहळू जागतिक नकाशावर आपले अस्तित्व दाखवून देत आहे. आधुनिकीकरणाच्या या जगतात येथील स्थानिकांनी माथेरानचे वेगळेपण जपले आहे. त्यामुळेच पर्यटनामध्ये माथेरानने भरारी घेतली असली तरी पर्यटकांकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याचे चित्र सध्यातरी पहावयास मिळत आहे. त्यामुळेच येथील पारंपारिक पर्यटन मागे पडत असून अधिकाधिक नफा मिळवण्याच्या नादामध्ये माथेरानचे पर्यटन मात्र मागे पडत चालले असून माथेरान हे बदलत आहे हे स्पष्ट आहे.

१८५० साली सर मॅलेट यांनी माथेरानचा शोध लावला. त्यानंतर माथेरानच्या पर्यटनामध्ये अनेक बदल घडत गेले. परंतु या काळात पर्यटक हाच देव ही भावना स्थानिक नागरिकांमध्ये जागृत होती. त्यामुळे आलेल्या पर्यटकांना जास्तीत जास्त चांगली सेवा देण्याकरिता येथील स्थानिकांचा जास्त भर असायचा. त्यामुळेच माथेरानमध्ये पूर्वी दहा ते पंधरा दिवस असे राहण्याकरता अनेक पर्यटक कुटुंब येत असत. परंतु कालांतराने माथेरानमध्ये काही व्यावसायिकांनी प्रवेश करून येथे पर्यटनापेक्षा अर्थार्जनासाठी अधिक प्राधान्य देताना कमी वेळेत अधिक नफा ही बीजे माथेरानमध्ये रोवली. या बीजांचा विस्तार इतका प्रचंड झाला आहे की, आता अनेक जण माथेरानच्या पर्यटनापेक्षा स्वतःचा आर्थिक फायदा कसा होईल, याकडे भर देत असल्याने माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांना त्याचा फटका बसू लागला आहे. त्यामुळेच येथील पर्यटन मात्र बदलत चालले आहे.

पूर्वी येथे सहकुटुंब येणारे पारसी व उच्चभ्रू वर्गातील लोक यांनी माथेरानकडे पाठ फिरवली आहे. तसेच दिवसेंदिवस वाढत चाललेली पर्यटकांची फसवेगिरी यामुळेही माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांना भुर्दंड सहन करावा लागत असल्याने एकदा आलेला पर्यटक माथेरानकडे पाठ करू लागला आहे. एप्रिल व मे हा कालावधी माथेरानचा मुख्य पर्यटन हंगाम म्हणून ओळखला जातो. परंतु या काळात माथेरानमध्ये आलेल्या पर्यटकांची संख्या कमी झाल्याचे दिसून येत आहे. येथील व्यवसाय हा फक्त विकेंड म्हणजेच शनिवार व रविवार वर येऊन ठेपला असून माथेरानच्या पर्यटनासाठी ही धोक्याची घंटा आहे.

पर्यटकांकडे दुर्लक्ष

प्रौढ, ९८७८ मुले असे एकूण ६४,४४६ पर्यटक दाखल झाले. त्यातून नगरपालिकेला २९ लाख ७५ हजार ३५० रुपये इतके उत्पन्न मिळाले. ही आकडेवारी पाहता माथेरान पर्यटनस्थळा भेट देणाऱ्या पर्यटकांमध्ये निश्चितच कमालीची घट झाली असून काही ठराविक व्यावसायिकांना सोडता इतरांना मात्र नक्कीच त्याचा फटका बसलेला आहे. माथेरानमध्ये होत असलेला बदल येथील पर्यटनाकरिता मारक आहे.

गुणवंत व्यक्तीचा सत्कार

। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।

म्हसळा तालुक्यातील रवी प्रभा मित्र संस्था रायगड यांच्या वतीने माणगाव, म्हसळा आणि श्रीवर्धन तालुक्यातील सामाजिक शैक्षणिक आरोग्य आणि प्रशासकीय अशा विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरीची दखल घेऊन गुणवंत मान्यवरांचा सत्कार म्हसळा येथील न्यू. इंग्लिश स्कुल महर्षी डॉ.बापूजी साळुंखे सभागृहात आयोजित करण्यात आला.

यावेळी ५० गुणवंत व्यक्तीचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमप्रसंगी अनिल नवगने, नंद कुमार शिर्के, सुजित तांदळेकर, मधुसूदन जाधव, प्राचार्य प्रकाश हाके, सुरेश कुडेकर, प्रफुल्ल पवार, अनिल काप, नितीन रिकामे, सुशांत लाड, संतोष उद्धरकर, अशोक सहाणे,व आम्ही गिरगावकर टीमचे पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

अनधिकृत झोपडपट्ट्यांवर कारवाई

। पनवेल। वार्ताहर ।

कळंबोली सेक्टर ८ मधील भूखंडावर नव्याने बांधलेल्या १० अनधिकृत झोपड्यांवर पनवेल महानगरपालिकेने सोमवारी कारवाई केली.

कळंबोली सेक्टर ८ मधील एका भूखंडावर दहा नवीन झोपड्या बांधण्यात आल्या होत्या. त्या मनपाच्या अतिक्रमणविरोधी पथकाने जेसीबीच्या साहाय्याने हटविल्या आहेत. मनपाच्या दक्षतेमुळे नवीन झोपडपट्टी वसविण्याचे मनसुबे उधळले आहेत. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील झोपड्या व इतर अतिक्रमणांवरही महानगरपालिकेच्या माध्यमातून आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली याठिकाणी नियमित कारवाई केली जात असून त्याठिकाणी लक्ष ठेवण्यात येत आहे.

अश्याच प्रकारे पनवेल शहर परिसरात व प्रामुख्याने मोहल्ला परिसरात अनधिकृत झोपडपट्ट्या उभारण्याचे काम काही समाजकंटक करीत आहे. त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी स्थानिक रहिवाशी करीत आहेत.

रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड समुद्रकिनाऱ्या लगत असणाऱ्या रस्तावर टपरीधारक व इतर दुकानारांनी रस्त्याअडवुन व्यवसाय करणाऱ्या वर मुरुड पोलीस व नगरपरिषदेची धडक कारवाई करण्यात आली. यावेळी पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ, पोलीस हवालदार संतोष गायकवाड पोलीस नाईक, किशोर बठारे, पोलीस नाईक आरती पवार, पोलीस नाईक सागर रसाळ, नगरपरिषदेचे मुकादम अभिजित चांदोरकर, सचिन कोरके, विनायक तळेकर आदिंसह पोलीस कर्मचारी व नगरपरिषद कर्मचारी या मोहिमेत उपस्थित होते. मुरुड हा पर्यटन स्थळ असून रोज शेकडो पर्यटक मुरुड समुद्रकिनारी ये-जा करीत असतात त्याबरोबर स्थानिक नागरिक ही येत असतात. परंतु या रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्यांनी आपली दुकाने रस्त्यावर मांडल्यामुळे पर्यटकांना व स्थानिकांना गाडी लावण्यासाठी जागा मिळत नव्हती. गाडीला धक्का लागला तर अपसात अनेक भांडण होत होती. यांची दखल मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ यांनी घेऊन रस्त्यात व्यवसाय करणाऱ्या २५ जणांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईने व्यवसाय करणाऱ्यांनी ताबडतोब आपली दुकाने मागे घेतल्याने रस्त्यांनीही मोकळा श्वास घेतला.

सुधाकर घारेतर्फे टँकरने पाणी पुरवठा

नेरळ : कर्जत तालुक्यातील रजपे ग्रामपंचायतीमधील पाचखडकवाडीमध्ये राहणारे आदिवासी धनगर समाजाच्या रहिवाशांना पिण्याचे पाणी आणण्यासाठी पाच किलोमीटर अंतरावर जावे लागत आहे. ही बाब सरपंच दिपाली पिंगळे यांनी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानुसार घारे यांच्या माध्यमातून पाचखडक वाडीमध्ये पाण्याचा टँकर पोहचला आहे. तालुक्यातील आदिवासी आणि ग्रामीण भागात पाण्याची तहान भागवण्यासाठी त्यांनी टंचाईग्रस्त भागात टँकरने पाणीपुरवठा करण्याचा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. यावेळी प्रमोद पिंगळे, हरेश घुडे, प्रकाश पिंगळे, अंकुश शेडगे, काळीबाई बांगरी उपस्थित होते.

पनवेलमध्ये आपत्ती व्यवस्थापन सज्ज

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल तालुक्यातील सात गावे ही पूरग्रस्त गावे असून तीन गावे दरडग्रस्त आहेत. सदरची परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने आपत्तीवर मात करण्याचे नियोजन केले आहे. त्यानुसार आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे. पनवेलमध्ये सरासरी दरवर्षी दोन हजार ८२४ मिलीमीटर पाऊस पडतो. गेली काही वर्षे पावसाळ्यात सातत्याने महापूर येऊन काही गावांमध्ये नदीचे पाणी शिरून घरातील सामानांचे मोठे नुकसान होत असते. तर डोंगराच्या पायथ्याशी घरे असलेल्या कुटुंबांना दरडीचा धोका पावसाळ्यात निर्माण होत असल्याचे समोर आले आहे.

तालुका प्रशासनाने तालुक्यातील संभाव्य आपत्ती लक्षात घेऊन आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार केला आहे. अतिवृष्टीमुळे सात गावांमध्ये पाणी शिरून नुकसान होणाऱ्या गावांमध्ये आपटा, चिपळे, करंजाडे, पारगाव / पारगाव डुंगी, दापोली भंगारपाडा, पाली देवद/शीलोत्तर रायचूर, भिंगारीपाडा काळुंद्रे यांचा समावेश आहे. तर दरड ग्रस्त गावांमध्ये चिंचवाडी धोदानी, सतीची वाडी मालडुंगे आणि धोदाणी या गावांचा समावेश आहे. पारगाव येथे सिडकोने केलेल्या भरावामुळे ग्रामस्थांच्या घरात पाणी जाऊन नुकसान होते. स्थलांतरासाठी आपटा गावातील नागरिकांसाठी राजीप शाळा आपटा, करंजाडे, पारगाव डुंगी आणि दापोली भंगारपाडा यांच्यासाठी राजीप शाळा सिडको करंजाडे, भिंगारीपाडा काळुंद्रे यांच्यासाठी राजिप प्राथमिक शाळा काळुंद्रे येथे पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. खाडी किनाऱ्यावरील वडघर, करंजाडे, कच्छी मोहल्ला पनवेल ही गावे आहेत. त्यांना अनुक्रमे स्थलांतरासाठी प्राथमिक शाळा वडघर पुनर्वसन मराठी शि. चिंचपाडा, राजीप शाळा सिडको करंजाडे, आणि पीर कमरअली शहा मनपा शाळा क्र. ६ येथे पर्यायी ठिकाणी ठेवण्यात आले आहेत. पूरग्रस्त दरडग्रस्त आणि खाडीकिनाऱ्यावरील गावांमध्ये पावसामुळे जवळपास ६०० हून अधिक कुटुंबे व साडेपाच हजार नागरिक बाधित होत असल्याची आकडेवारी देण्यात आली आहे. तहसील विभागातर्फे त्यांच्या स्थलांतरासाठी पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे.

क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **घरकामासाठी रहिवासी स्वरूपाची** चांगणे जेवण बनवणारी बाई हवी आहे. ९४२१९५४३४८- (१०,०००)
- **लग्न मुहूर्ताला येणाऱ्या पाहुण्यांसाठी**, ग्रुप बुकिंगवर, हॉटेल रुम देणे आहे. भेटा नवीन हॉटेल 'द बनयन शेल्टर्स' चोंढी, मांडवा रोड. ९८५०४२७७२८, ९८२२२५७९२९
- **PICK UP/407 टेम्पोवर अनुभवी** २ ड्रायव्हर मांडवा येथे हवे आहेत. १५०००/- ८००७८९३२३२/९४२१९५४३४८
- **व्यवसाय विषयक शिका विका कमवा** सरबत प्रिमिक्स/मिल्कशेक प्रिमिक्स/कोल्ड कॉफी मॉकटेल कोर्स किंवा कुल्फी कोर्स आणि इतर अनेक कोर्सेस उपलब्ध ०९५२९१९९२१६
- **अलिबागमध्ये दुकानात** कामासाठी मुलगा पाहिजे ७९७२७९३३७०/८१४९६७३०१८
- **अलिबाग येथे कामासाठी माणूस पाहिजे** शिक्षण कोणतीही अट नाही. वय : २० ते ३५ वर्षे दरम्यान असावे. पगारः रुपये १३०००/- महिना. फोनः ९८२२०९५८०३
- **नागावमधील नामांकित रिसॉर्टसाठी** हाऊसकिपींग मॅनेजर, सुपरवायजर, रूम सर्व्हिस, या पदांसाठी रेसीडेन्शल/नॉन रेसीडेन्शल महिला/पुरूष पाहिजेत. कृपया उमेदवारांनी खालील नंबरवर संपर्क करावा. ९९२१८३८८५५, ८१६९१०१७०२
- **कुकूचकू पोल्ट्री फार्म प्रा.लि.करीता** मुले पाहिजेत. कार वर लायसेन्स धारी ड्रायव्हर पाहिजे पगार :१५,०००/- संपर्क HRअनुष्का राऊत-७७९८८८३८६४
- **श्री.सिद्धीविनायक ज्योतिष,** सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं.९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- **अलिबाग येथील स्वाधार,** दिव्यांग प्रशिक्षण केंद्राच्या वस्तीगृहासाठी निवासी/अनिवासी सेवक तसेच स्वयंपाक करण्यासाठी महिला पाहिजे. संपर्क:९०९६२१४२९४
- **अलिबागमध्ये आर्किटेक्चरल फर्मकरिता** ऑटोकॅड ड्रॉप्समन पाहिजेत. संपर्क : ९४२२०९४१५१/९२७०८२७८२९
- Manu shetty Architects need architecture DRAFTSMAN with minimum 2 yr. experience for Nagaon office. Please Whats App CV to 9820437654

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

उरण परिसरात जैवविविधतेचा ऱ्हास

अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष; पर्यावरणवाद्यांचा आरोप

। उरण । वार्ताहर ।

जेएनपीटी बंदर आणि उरणसह नवी मुंबईतील विविध भागात पर्यावरणासह, जैवविविधतेचाही वेगाने ऱ्हास होत आहे. त्याला येथील जनता आणि अधिकारी यांच्याकडून होणारे सातत्याचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष कारणीभूत असल्याचा आरोप पर्यावरणवाद्यांनी केला आहे. महाराष्ट्र किनारपट्टी प्रभाग व्यवस्थापन प्राधिकरण हे पैसे वसूलीचे क्षेत्र बनवण्यापासून प्रतिबंध करण्याचीही मागणी पर्यावरणवाद्यांनी यावेळी केली.

जी-२० उपक्रमाच्या सी-२० अंतर्गत शनिवारी आयोजित केलेल्या परिषदेमध्ये या भागातील पर्यावरणप्रेमी सहभागी झाले होते. पर्यावरणवाद्यांनी जनतेची उदासीनता आणि अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष एकत्रितपणे ऱ्हासासाठी कारणीभूत असल्याचा मुद्दा प्रकर्षाने पुढे आणला. तसेच सीआरझेड क्षेत्राचा संचरनात्मक प्रकल्पाच्या नावाने व्यावसायिक दुरुपयोग करण्याबद्दल पर्यावरणवाद्यांनी नाराजी व्यक्त केली. स्वामी विवेकानंद केंद्र, नवी मुंबई आयोजित कार्यक्रमात 'वैविध्य, समावेशकता आणि परस्परांप्रति आदर' हा विषय होता. नॅटकनेक्ट फाउंडेशनने या विषयावर जैवविविधता, समाजाचा समावेश नसलेल्या पर्यावरण धोरणांमधल्या त्रुटी दाखवून दिल्या. संस्थेने शासन आणि जनतेला पर्यावरणाविषयी आदर राखण्याची विनंती देखील करण्यात आली.

पाणथळ क्षेत्रे, कांदळवने, दलदलीचे भागातील डोंगराळ भागांच्या होणाऱ्या ऱ्हासाकडे यावेळी लक्ष वेधून घेण्यात आले. त्यांनी शासकीय अधिकाऱ्यांची निष्क्रियता या सर्वांसाठी जवाबदार असल्याची जोरदार टिका नॅटकनेक्टचे संचालक बी.एन.कुमार यांनी केली. उच्च न्यायालयाद्वारे नियुक्त केलेल्या कांदळवन आणि पाणथळ क्षेत्र समितीने पाहणी करुन देखील उरण, खारघर, उलवे, वाशी आणि मानखूर्द येथील वारंवार घडत असलेल्या विनाशाच्या कृतींवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. उरणच्या तीन महत्त्वाच्या पाणथळ क्षेत्रांवर भराव घालण्यात आला आहे. आणि नेरुळ येथील दोन पाणथळ क्षेत्रांवर देखील गोल्फ कोर्ससाठी विनाशाची टांगती तलवार असल्याची माहिती कुमार यांनी दिली.

रूफटॉप सोलरमुळे वीजबिलात मोठी कपात

॥ संस्थांचा वाढता प्रतिसाद : विजय सिंघल

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यातील विविध सहकारी गृहनिर्माण संस्थांनी त्यांच्या इमारतींवर रूफ टॉप सोलर प्रकल्प बसविल्याने सोसायटीच्या वीजबिलात मोठी कपात झाली आहे. राज्यात ३,०२६ हाऊसिंग सोसायट्यांनी ५२ मेगावॅट वीजनिर्मिती क्षमता गाठली असून अधिकाधिक संस्थांनी छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवावेत, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी केले.

सिंघल म्हणाले की, रूफ टॉप सोलरमुळे सोसायटीच्या छतावर निर्माण झालेली वीज सोसायटीतील लिफ्ट, पाण्याचे पंप तसेच इमारतीतील जिने व पार्किंग येथील सार्वजनिक दिवे इत्यादी कामांसाठी वापरली जाते. सोसायटीच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पामध्ये गरजेपेक्षा जास्त वीज निर्माण झाली तर ती महावितरणला दिली जाते व त्याची नोंद नेट मिटरिंगद्वारे ठेवली जाते. सौर ऊर्जा निर्मितीपेक्षा जर अधिक विजेची गरज पडली तर ती महावितरणकडून घेतली जाते. महावितरणला सोसायटीकडून मिळणाऱ्या विजेच्या बदल्यात सोसायटीच्या वीजबिलात कपात होते. ते म्हणाले की, ठाण्यातील एका गृहनिर्माण संस्थेने ९० किलो वॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प बसविल्यानंतर त्यांचे दीड लाखाचे वीजबिल ७१ हजारांवर आले. ठाण्यातीलच आणखी एका हाऊसिंग सोसायटीने ८० किलो वॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प बसविल्यानंतर त्यांचे विजेचे बिल १ लाख ४८ हजारांवरून ६६ हजारांवर आले. भांडूपच्या एका गृहनिर्माण संस्थेने ४० किलो वॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प बसविल्यानंतर त्यांचे १ लाख २० हजार रुपयांचे वीजबिल ३८ हजारांवर आले.

हाऊसिंग सोसायट्यांना छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्यासाठी महावितरण मदत करते. महावितरणच्या www.mahadiscom.in/ismart या संकेतस्थळावर याची संपूर्ण माहिती देण्यात असून ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची सुविधा आहे.

गृहनिर्माण संस्थांना ५०० किलोवॅट क्षमतेपर्यंतच्या छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पासाठी २० टक्के अनुदान मिळते. सौर ऊर्जानिर्मितीसाठी वापरलेले पॅनेल्स, वायर्सची गरज, पॅनेल्स बसविण्याच्या स्थानाची स्थिती इत्यादीनुसार खर्चात फरक पडतो. नोंदणी असलेल्या एजन्सीमार्फत प्रकल्प बसविले जातात. महावितरण प्रकल्पाच्या मंजुरीपासून तपासणी व अंतिम मंजुरीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर मदत करते, अशी माहिती त्यांनी दिली.

आपटा येथे जलजीवन मिशन योजनेचे काम निकृष्ट?

जलजीवन मिशनसाठी नाबार्ड या संस्थेचे अधिकारी पाहणीसाठी योजले आहेत. परंतु पाणीपुरवठा अभियंता यांनी जागेची पाहणी केली नाही. पाईपलाईन इस्टीमेटनुसार टाकली नाही. पाईपलाईनसाठी खोदकाम ३ फुटाचे न करता कमी फुटावर खोदून वरचेवर माती टाकली आहे. कोणत्याही प्रकारचे नियोजन न करता काम चालू केले आहे. त्यामुळे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे. परिणामी भ्रष्टाचार होण्याची शक्यता आहे. जलजीवन मिशन योजनेसाठी सरपंच हे अध्यक्ष व ग्रामसेवक हे सचिव आहेत. मात्र ग्रामस्थांना विश्वासात न घेता ग्रुपग्रामपंचायत आपटा अंतर्गत असणाऱ्या सारसई आदिवासी विभागात योजना का सुरू करण्यात आली? असा प्रश्न ग्रामस्थ व पंचायत सदस्य विचारत आहेत.

- स्वप्निल भोवड, ग्रामस्थ, आपटा ग्रामपंचायत

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल तालुक्यातील आपटा ग्रामपंचायत हद्दीत जलजीवन मिशन योजनेचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात असून याबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे. आपटा ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांना मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याने पाण्याची समस्या दूर व्हावी याकरिता नळ पाणी पुरवठा योजनेंतर्गत विविध कामे मंजूर करण्यासाठी निधी उपलब्ध करण्यात आला. त्यानंतर संबंधित कंत्राटदाराकडून पाणी पुरवठ्याचे काम करण्यात आले. मात्र सदर काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून वाडीवस्त्यांवर नागरिकांना पाण्यासाठी अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे पाण्यासाठीची परवड दूर व्हावी याकरिता तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

जलजीवन मिशन योजनेंतर्गत आपटा ग्रामपंचायतीसाठी जलस्रोत (उद्भव) असणाऱ्या पाताळगंगा नदीचे पाणी फिल्टरेशन करण्याच्या कामासाठी १ कोटी ५२ लाख रुपये निधी उपलब्ध करण्यात आला होता. मात्र संबंधित कंत्राटदाराकडून नदीच्या पाण्याची तपासणी न करता फिल्टरेशन प्लांटद्वारे पाणीपुरवठा योजनेचे काम चालू केले असून कामाचा दर्जाही निकृष्ट असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. पाताळगंगा नदीमध्ये अनेक प्रकारच्या केमिकल्सचे प्रमाण आहे. यासह परिसरातील कचराही नदीच्या प्रवाहात सोडला जातो. त्यामुळे अनेक वर्षे दूषित असलेल्या पाताळगंगा नदीचे पाणी शुद्ध कसे होणार? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या सर्व कामाची नाबार्ड या संस्थेद्वारे पाहणी योग्यरित्या केली नसल्याने ग्रामस्थ नाराजी व्यक्त करीत आहेत. सारसई आदिवासी विभागासाठी बोअरवेल जलस्रोताद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी १ कोटी ४६ लाख रुपये निधी उपलब्ध करण्यात आला. परंतु ग्रुप ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांना विश्वासात न घेता काम चालू केले असल्याचा आरोप करण्यात येत आहे. सारसई आदिवासी वाडीमध्ये एकूण ८ आदिवासी वाड्या आहेत. त्यातील माडभुवन ह्या आदिवासीवाडी पासून कामाची सुरुवात केली आहे. त्याठिकाणच्या बोअरवेलचे पाणी अत्यंत कमी प्रमाणात येत असुन सदर वाडीसाठी तोच जलस्रोत वापरून जलजिवन मिशन योजना वापरण्याचा हेतू आहे. त्यातच डोंगरपठारावर बोअरवेलचे पाणी जास्त प्रमाणात मिळत नाही. त्यामुळे आदिवासी वाड्यांना टँकरने पाणी पुरवठा केला जातो. त्यातही टँकर वेळेवर येत नसुन नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

सेंट विल्फ्रेडच्या विद्यार्थ्यांचे यश

। रसायनी । वार्ताहर ।

बारावीच्या परीक्षेत शेडूंग येथील सेंट विल्फ्रेड हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करून घवघवीत यश संपादन केले.

यात सेंट विल्फ्रेड हायस्कूलचा बारावी कला १००% निकाल, बारावी वाणिज्य ९७% आणि बारावी विज्ञान ९७% निकाल लागला. कला शाखेतून संस्कार विजय धनावडे याने ९२% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. शंकर मुथुकुमार ८९.६७% मिळवून दुसऱ्या क्रमांकावर आहेत. रेणुका आशिष मोरे आणि खुशी महेश बालशेट्टी यांनी ८३.८३% गुण मिळवून तिसरा क्रमांक पटकावला.विज्ञान शाखेत वैशाली पाटील ७६%, तुषार सिंग ७१.१७% आणि इंशा खान ७०% गुणांसह अव्वल आहेत. विज्ञान शाखेत त्यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. वाणिज्य शाखेतील टॉपर्स सुरभी पंढरपुरे ९३% गुण मिळवून वाणिज्य शाखेतून तसेच महाविद्यालयातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. स्वीकृती दुबे हिने ८९% गुण मिळवून दुसरा तर पूजा गुप्ताने ८६.८३% गुण मिळवून तिसरा क्रमांक पटकावला.

वाढदिवसानिमित्त विकासकामे

। पनवेल । वार्ताहर ।

विकास कामांचे लोकार्पण आणि उद्घाटनांनी शेतकरी कामगार पक्षाचे आदईचे सरपंच रमाकांत गरुडे यांचा वाढदिवस साजरा होणार आह गरुडे यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्ताने १ जून २०२३ रोजी सकाळी १० वाजता आदई ग्रामपंचायत अंतर्गत विविध विकास कामांचे लोकार्पण आणि उद्घाटन त्याचबरोबर आधारकार्ड शिबिराचे आयोजनही करण्यात आले आहे.

यानंतर सायंकाळी ७ वाजता अभिष्टचिंतन आणि गुरु कदम संगीत जलसा हा मनोरंजनांचा कार्यक्रम पनवेलमधील मार्केट यार्ड येथे आयोजित केलेला आहे. या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन सरपंच रमाकांत गरुडे यांनी केले आहे.

अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या परप्रांतियांवर कारवाईची मागणी

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल महानगरपालिके मार्फत अतिक्रमण मोहीम सर्वत्र चालू असताना शहरात या मोहिमेला अतिक्रमण विभागाने दुर्लक्ष केल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे शहरातील मोक्याच्या ठिकाणी अनेक परप्रांतीयांसह नारळासह सरबत विक्रेत्यांनी शासनासह हॉस्पिटल परिसरातील मोक्याच्या जागा अडवल्याने तीव्र संताप पनवेलकरांनी व्यक्त केला आहे. स्थानिक भूमिपुत्रांच्या व्यवसायाला अतिक्रमण विभाग तातडीने कारवाई करते तर या परप्रांतीयावर का मेहरबानी असा सवाल पनवेलकर करीत आहेत.

या फेरीवाल्यांनी मुख्यतः नारळपाणी वाल्यांनी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल तालुका पोलीस ठाणे समोरील शासकीय जागा, विविध रुग्णालय परिसर तसेच तहसीलदार कार्यालय परिसर, गुणे हॉस्पिटल, प्राचीन हॉस्पिटल, लाईफलाईन हॉस्पिटल, पनवेल कोर्ट मुख्य समोरील फुटपाथवर, तक्का येथे जाणाऱ्या बायपास रोडवर, दुर्गामाता मंदिर शेजारी या ठिकाणी परप्रांतीय फेरीवाल्यांनी आपले बस्तान बसवले आहे. या नारळविक्रेत्यांमध्ये बांगलादेशी असल्याचा संशय नागरिकांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे या अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या परप्रांतीयांच्या कागदपत्रांची तपासणी करावी अशी मागणी होत आहे.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. महेश वासुदेव गोडबोले रा. १३३१ गंधार, स्वामी समर्थ नगर, स्वामी समर्थ केंद्राजवळ, चेंढरे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरुन आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पैसे)
चेंढरे ता. अलिबाग	३२/१/अ/५	०-०३-६८ (३६८ चौ.मी.)	३६-८०

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेटेनन्स मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही. तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दि. ३०-०५-२०२३

सही/-
ॲड. आर.बी. कोसमकर
चिरायु, ब्राह्मण आळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे भोईघर ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १.नेत्रा नरेश बिरवाडकर (लग्नानंतर नेत्रा समीर महागावकर) २.वेदांती नरेश बिरवाडकर (लग्नानंतर वेदांती सुमित बेलेनोर) दोघी रा.अंबोली, अंधेरी-पश्चिम मुंबई ४०००५८ यांच्या नावे असलेली मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील खालील वर्णन केलेली मिळकत आमचे स्नेही श्री. सिद्धेश दिनेश लाड, रा.स्टारलाईन बी/३, प्लॉट नं.२०, गोराई १, बेस्ट क्वार्टस जवळ, बोरिवली - पश्चिम, मुंबई ४०० ०९१ यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग क्रमांक		क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
भोईघर ता. मुरूड	२७२	--	१-६३-४०	११.६३
		पो.ख.	०-०१-००	
		एकूण	१-६४-४०	

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकानी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, असे गृहीत धरुन वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ३०/०५/२०२३

सही/-
श्री.किशोर वामन तेलंगे
पत्ता- श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक सो. कार्यालयासमोर
दुकान गाळा क्र. १, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

MAHATRANSCO — RE - E-TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

Sr. No.	Particulars	Description
1	Tender No. & Name of Tender	**RFx No. 7000027557** **Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/ Re-e-Tender-30/2023-2024. RFx Re-E-Tender for Work of tree cutting work of various 100KV & 220KV Lines under EHV Lines S/Dn., Panvel–1 & 2 for the FY - 2023-24 under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount**: Limited to Rs. 20,00,000/- **EMD:** Rs. 20,000/-
2	Online Downloading of the RFx	30.05.2023, 18:00 Hrs to 06.06.2023, 23:59 Hrs.
3	Online Submission of the RFx	On or Before 06.06.2023 up to 23:59 Hrs.
4	Online Opening of the Techno-Commercial RFx	07.06.2023 at 11:00 Hrs (If possible)

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
Contact Person: The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
Note: All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
EHV (O&M) Dn., Panvel

ग्रुप ग्रा.प.बळवली ता.पेण,जि.रायगड
जाहिर निविदा

सरपंच ग्रुप ग्रा.प.बळवली ता.पेण.जि.रायगड यांच्या वतीने स्वाक्षरी करणारे खाली, नमुद केलेल्या कामासाठी टक्केवारी दराने मोहरबंद निविदा मागवित आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	योजनेचे नाव	अ.प.रक्कम	इसारा रक्कम	टेंडर फि	मुदत
१	स्मशानभुमी साईडला गटार बांधणे.	१५ वा वित्त आयोग	१,७०,०००	१७००	१००	६ महिने
२	वैयक्तिक नळकनेक्शन वळक येथे देणे.	१५ वा वित्त आयोग	२,६८,३४६	२६८३	१००	६ महिने
३	जि.प.बळवली शाळा व्यासपीठ तयार करणे.	१५ वा वित्त आयोग	१,१०,२६३	११२६	१००	६ महिने
४	निगडावाडी अंतर्गत रस्ता कॉक्रिट करणे.	१५ वा वित्त आयोग	८१,८४२	८१८	१००	६ महिने
५	ग्रा.प.हद्दित चार सीट शौचालय बांधणे.	१५ वा वित्त आयोग	२,९९,८६१	२९९९	१००	६ महिने
६	मेडीक्लोर खरेदी करणे.	१५ वा वित्त आयोग	५०,०००	-	१००	६ महिने
७	महिलांचे आरोग्य शिबीर घेणे.	१५ वा वित्त आयोग	३६,८६६	-	-	-
८	LED बल्ब खरेदी करणे.	१५ वा वित्त आयोग	२०,०००	-	-	६ महिने

अटी व शर्ती व सुचना

१.कामांचे अंदाजपत्रका प्रमाणे काम करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.
२.वरील काम हे उपअभियंता बांधकाम पेण यांच्या मार्गदर्शनाखाली करायचे आहे. पुरवठादाराने जीएसटी काढलेला असावा.
३.कामांच्या मुल्यांकन रक्कमेतून अधिकृत करांची कपात करण्यात येईल.
४.निविदा मिळण्याचे दिनांक ३१-५-२०२३ पासून.
५.निविदा स्विकारण्याचे अंतिम दिनांक ९-६-२०२३ पर्यंत.
६.निविदा स्वीकारण्याची वेळ सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत राहिल.
७.निविदा लगतच्या मासिक सभेत उघडण्यात येतील.
८.कामाचे मुल्यांकन मिळालेनंतरच देयक अदा करण्यात येईल.
९.सदरचे ठेकेदार नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता किंवा मंजूर सहकारी संस्था असल्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
१०. सर्व निविदा स्वीकारनेचा व नाकरनेचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

ग्रामसेवक
ग्रुप ग्रा.प.बळवली

सरपंच
ग्रुप ग्राम पंचायत बळवली

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

MAHATRANSCO — E-TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

Sr. No.	Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/	Description	Estimated Cost	Submission Date
1	e-Tender-13/23-24/ **RFx No. 7000027381**	AMC for regular maintenance work, Outage work and attending emergency breakdown work of 220 kV & 400 kV Transmission Lines under jurisdiction of 400 kV Line Maintenance S/dn, Nagothane under EHV O&M Circle, Panvel... **2nd Call**	Limited to Rs. 25 Lakh	05.06.2023 up to 23:59 Hrs.
2	e-Tender-05/23-24/ **RFx No. 7000027517**	Hiring of MMV (i.e. Mahindra Bolero camper or similar) for movement of officers for supervision/official work for Maintenance & Testing Unit under 400 KV R.S. Nagothane Division for 2023-24... **Re-Tender**	Rs 5,99,555/-	05.06.2023 up to 23:59 Hrs.

EMD: 1% of Estimate Cost & **Tender Fee:** Rs. 500/- + GST. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
Contact Person: Mitesh Goyal (DY. EE) Mob No. 9461456635
e-mail ID: **ee7230@mahatransco.in Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
400kV R.S. (O&M) Dn., Nagothane

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे पाझर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रामचंद्र शंकर वाघमारे यांच्याकडून माझ्या अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नंबर	क्षेत्र हे.आर.
पाझर, ता. अलिबाग, जि. रायगड	२५०/२	०-१४-३०
		पो.ख. ०-००-८०
		एकूण ०-१५-१०

तरी वरील संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, बक्षीस, लीज, लीन, चार्ज, पोटगी, ताबा, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्या पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरुपात हरकत घ्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क, हितसंबंध नाही. अगर असल्यास तो सोडून दिला आहे असे समजून सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेल्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : ३१/०५/२०२३

ॲड. सुहास शरद कारुळकर
जिल्हा न्यायालय अलिबाग
अलिबाग-रायगड
मो. नंबर- ९९२१५५२९९१

जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचेतर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे :-

मौजे-चौल, ता. अलिबाग, जि. रायगड हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत.

गट नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.	आकार रु.पैसे
२५५८	-	०.५२.६०	२९.१९
		पैकी ०.०७.५०	

वर नमूद मिळकतीपैकी दुसरेपक्षी यांचे हिश्श्याचे व मालकीचे ०.०७.५० हे.आर. इतके क्षेत्राची बागायत मिळकत, त्यात असलेला झाडझाडोरा, वहिवाटीचे हक्क, वहिवारंग, कुंपण वगैरे सह अशी मिळकत माझे अशिल यांनी मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सागर वसुंधरा शिरोळे, मु. ८८६, दिनकर निवास, भांडारकर रोड, डेक्कन जिमखाना, पुणे - ४११ ००४ यांचेपासून खरेदी घेणेबाबत वाटाघाट केली असून मिळकतीचे विद्यमान मालक यांनी संदर्भित मिळकत त्यांचे मालकी हक्काची व निर्वेध असल्याचा भरवसा माझे अशिल यांस दिला असून मिळकतीच्या मालकी हक्काची तपासणी करण्यास संमती दिली आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, दान, कब्जा, वहिवाटीचे हक्क, लिन, कुळ, वहिवाटस या दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरुपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख - ३०.०५.२०२३

(ॲड. एस. वाय. बारटक्के)
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकतीचे मालक **लालचंद्र सखाराम घरत, चंद्रकांत रतिलाल पाटील** यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आमचे अशिल यांना कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलाबरोबर शेतजमीन मिळकतीच्या मालकांनी केलेली आहेत. **मौजे शिंगढोळ, ता. कर्जत, जि. रायगड** येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)	आकार (रु.पै.)
७८/१	०.३५.०० ०.१६.०० पो.ख. **०.५१.०० एकूण**	०.१९
७८/३	२.८६.०० ०.६६.०० पो.ख. **३.५२.०० एकूण**	१.९५
७८/७	०.०७.०० ०.०३.०० पो.ख **०.१०.०० एकूण**	०.०३

तरी मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा, पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे मनाई हुकूम, करारनामा व इतर हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून **१४ (चौदा) दिवसांचे** आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. त्याप्रमाणे मुदतीत कुणाचीही हरकत न आल्यास वर नमुद मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून त्यासंबंधी कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहित धरुन व्यवहार पूर्ण करतील व दिलेल्या मुदतीनंतर उपस्थित केलेली कुणाचीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक ३०/०५/२०२३

सही/-
ॲड. जगदिश पांडुरंग कराळे
(एम.ए.एल.एल.बी.)
मोबाईल नं. ८३६९२१७३१३
ऑफिस : गाळा नंबर ०४, श्रीराम मंदिर जवळ, जुनी बाजारपेठ नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१

निवडक

जियो सिनेमाचा विक्रम

अहमदाबाद : इंडियन प्रीमियर लीगचा अंतिम सामना सोमवारी रात्री पार पडला. यामध्ये गुजरातला शह देत चेन्नईने पाचव्यांदा आयपीएलच्या ट्रॉफीवर आपलं नाव कोरलं. पावसाच्या व्यत्ययामुळे हा सामना चक्क रात्री दोन वाजेपर्यंत लांबला. मात्र, तरीही तब्बल ३.२ कोटी लोकांनी हा सामना स्ट्रीम करून पाहिल्याचं आकडेवारीमध्ये समोर आलं आहे. यामुळे जिओ सिनेमाने नवीन रेकॉर्ड केला आहे. यापूर्वी २४ मे रोजी झालेल्या गुजरात वि. चेन्नई सामन्याला तब्बल २.५ कोटी लोकांनी जिओ सिनेमा ॲपवर स्ट्रीम केलं होतं.

नीरज चोप्राची माघार

नवी दिल्ली : टोकियो ऑलिंपिक सुवर्णपदक विजेता आणि यंदा मे महिन्यात झालेल्या डायमंड लीगमध्ये पहिला क्रमांक पटकावलेला भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रा याने दुखापतीमुळे येत्या चार जून रोजी होणार असलेल्या फॅनी ब्लँकर्स कोएन गेम्स, जागतिक थलेटिक्स कॉंटिनेंटल टूअर गोल्ड स्पर्धेमधून माघार घेतली आहे. याबाबत नीरज याने स्वत:हून ट्विवर या सोशल माध्यमावर याबाबत माहिती दिली.

जोकोविचची सलामी

पॅरिस : सर्बियाचा टेनिसपटू नोवाक जोकोविच याने फ्रेंच ओपन टेनिसमध्ये पुरुष एकेरीच्या सलामीच्या लढतीत अमेरिकेच्या अलेक्झँडर कोवासेविच याच्यावर ६-३, ६-२, ७-६ असा विजय साकारला आणि पुढल्या फेरीत प्रवेश केला. जोकोविच याने पहिला, दुसरा सेट सहज जिंकला. तिसऱ्या सेटमध्येही तो आघाडीवर होता. मात्र कोवासेविच याने बरोबरी साधली. मात्र टायब्रेकमध्ये जोकोविचने बाजी मारली. जोकोविचने ही लढत दोन तास व २६ मिनिटांमध्ये जिंकली.

महिलांना प्रशिक्षण

रसायनी : रायगड तायक्कांदो असोसिएशन आणि गोदरेज लिव्हिंग कम्युनिटी मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने महिला आणि लहान मुलांसाठी सेल्फ डिफेन्स शिक्षण सत्राचे आयोजन गोदरेज लिव्हिंग गोदरेज लिव्हिंग यांनी केले होते. यावेळी महिला व मुलांना स्वसंरक्षण कसे करावे यावर तायक्कांदो मार्शल आर्ट कराटे प्रात्यक्षिके शिकविण्यात आली. या सत्रात ९२ प्रशिक्षणार्थी सामील झाले होते.

महेंद्रसिंग धोनी दुखापतग्रस्त

नवी दिल्ली : चेन्नईचा कर्णधार महेंद्रसिंग धोनीला गुडघ्याच्या दुखापतीमुळे रुग्णालयात दाखल करण्यात येणार आहे. त्याच्यावर काही चाचण्या केल्या जाणार आहेत, त्यासाठी त्याला कोकिलाबेन रुग्णालयात दाखल करणार आहे. अंतिम फायनल जिंकल्यानंतर धोनी सेलिब्रेशन करत असतानाही धोनीच्या गुडघ्याला पट्टा होता. धोनीला या आठवड्यात रुग्णालयात दाखल केले जाऊ शकते.अद्याप त्यावर निर्णय झालेला नाही.

चेन्नईवर बक्षिसांची खैरात

स्पर्धेतील बक्षिसपात्र खेळाडू

इमर्जिंग प्लेयर ऑफ द इयर - यशस्वी जैस्वाल - १० लाख , **पर्पल कॅप** - मोहम्मद शमी - २८ बळी (१० लाख रुपये), **ऑरेंज कॅप** - शुभमन गिल - ८९० धावा (१० लाख), **हंगामातील सर्वाधिक षटकार** - फाफ डुप्लेसी - ३६ षटकार - १० लाख, **गेम चेंजर ऑफ द सीझन** - शुभमन गिल - १० लाख,**मोस्ट व्हॅल्युएबल प्लेयर** - शुभमन गिल - १० लाख, **मोसमातील सर्वात लांब षटकार :** फाफ डू प्लेसिस - १० लाख, **कॅच ऑफ द सीझन** - राशिद खान - १० लाख , **पेटीएम फेअरप्ले पुरस्कार** - दिल्ली कॅपिटल्स, **हंगामातील सर्वोत्तम खेळपट्टी आणि मैदान** - वानखेडे स्टेडियम आणि ईडन गार्डन्स - ५० लाख , **सुपर स्ट्रायकर ऑफ द सीझन** - **ग्लेन मॅक्सवेल** - १० लाख सर्वाधिक चौकार - शुभमन गिल (८५) - १० लाख

। अहमदाबाद । वृत्तसंस्था । महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली चेन्नई सुपर किंग्जने पाचव्यांदा आयपीएलचे विजेतेपद पटकावले. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात बक्षिसांची खैरातही त्याच्यासह संघावर झाल्याने सारेजण मालामाल झाले.

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर पावसाने व्यत्यय आणलेल्या अंतिम सामन्यात चेन्नईने गतविजेत्या गुजरात टायटन्सचा शेवटच्या चेंडूवर पराभव केला. या विजयासह चेन्नईने सर्वाधिक ५ विजेतेपद पटकावण्याच्या मुंबई इंडियन्सच्या विक्रमाची बरोबरी केली. आयपीएल २०२३ च्या अंतिम सामन्यात चेन्नई सुपर किंग्जला डकवर्थ-लुईस नियमानुसार १५ षटकांत विजयासाठी १७१ धावांचे लक्ष्य मिळाले जे त्यांनी शेवटच्या चेंडूवर पूर्ण केले.

चेन्नई सुपर किंग्सला केवळ चमकदार ट्रॉफीच मिळाली नाही, तर संघाला विजेते म्हणून २० कोटी रुपये बक्षीस म्हणून मिळाले. तर उपविजेत्या गुजराज टायटन्सला १२.५ कोटी रुपयांचे बक्षीस मिळाले. याशिवाय तिसऱ्या स्थानावर राहिलेल्या मुंबई इंडियन्सला बक्षीस म्हणून ७ कोटी रुपये मिळाले. दुसरीकडे चौथ्या स्थानावर असलेल्या लखनौ सुपर जायंट्सला बक्षीस म्हणून ६.५ कोटी रुपये मिळाले आहेत.

आयपीएलच्या पहिल्या सत्रात विजेत्याला ४.८ कोटी रुपये मिळाले होते. त्याच वेळी उपविजेत्याच्या बॅगमध्ये २.४ कोटी रुपये आले. तेव्हापासून बक्षिसाची रक्कम अनेक पटींनी वाढली आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून बक्षिसाच्या रकमेत वाढ झालेली नाही. मात्र पुढील वर्षी त्यात वाढ होऊ शकते. आयपीएल २०२३चे विजेतेपद जिंकणाऱ्या चेन्नई सुपर किंग्स आणि उपविजेत्या गुजरात टायटन्सवरच पैशांचा पाऊस पडला. पर्पल, ऑरेंज कॅप जिंकणाऱ्यांव्यतिरिक्त, हंगामातील सर्वात जास्त षटकार मारणाऱ्या इमर्जिंग प्लेयरवरही पैशांचा वर्षाव करण्यात आला.

रायगडचे कराटेपटू सरस

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

वर्ल्ड ट्रॅडीशनल शोतोकान फेडरेशनचे विद्यमाने शिहान सत्रजित चौधरी यांचे मार्गदर्शनाखाली म्हापसा (गोवा) येथील पेडेम स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे ऑल इंडिया कराटे चॅम्पियनशिपचे आयोजन करण्यात आले होते. जवळपास १५ राज्ये आणि सुमारे ७०० विद्यार्थ्यांनी सदर स्पर्धेत सहभाग घेतला होता.देशातील खूप नामांकित स्पर्धा म्हणून सदर स्पर्धेकडे पाहिले जाते. या स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी दैदिप्यमान कामगिरी करीत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

सेंसेई संतोष मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र संघाकडून खेळताना चॅम्पियन्स कराटे क्लब, श्रीवर्धन, म्हसळा येथील खेळाडूंनी उत्तम खेळाचे प्रदर्शन करीत उपस्थितांची मने आणि पारितोषिके जिंकली. त्यामध्ये सिद्धी दिपक सावंत (श्रीवर्धन) वैयक्तिक कुमिते प्रकारामध्ये सुवर्ण, वैयक्तिक काता प्रकारामध्ये कास्य, ग्रुप कातामध्ये सुवर्ण, विक्रांत विश्वास खांडेकर (म्हसळा): वैयक्तिक कुमितेमध्ये रौप्य. वैयक्तिक कातामध्ये व ग्रुप कातामध्ये सुवर्ण, निर्मयी यतीन करडे (म्हसळा): वैयक्तिक कुमितेमध्ये रौप्य, व ग्रुप कातामध्ये सुवर्ण, आयुष सचिन शिगवण (म्हसळा) : वैयक्तिक काता सुवर्ण, वैयक्तिक कुमिते मध्ये रौप्य व ग्रुप कातामध्ये सुवर्ण, आर्या योगेश करडे (म्हसळा):ग्रुप कातामध्ये सुवर्ण, अनिकेत सुरेश साखरे (प्रशिक्षक श्रीवर्धन-बोर्ली-दिवेआगर): वैयक्तिक कुमितेमध्ये सुवर्ण व कातामध्ये कांस्य, अविनाश मोरे (मुख्य प्रशिक्षक, रायगड) : ज्युनियर प्रशिक्षक कॅटेगरीमध्ये खेळताना वैयक्तिक काता प्रकारामध्ये सुवर्ण व वैयक्तिक कुमितेमध्ये कांस्य, श्रीवर्धन, म्हसळा तालुक्यातील खेळाडूंनी देशपातळीवर संपन्न झालेल्या स्पर्धेत दैदिप्यमान कामगिरी केल्यामुळे आपल्या जिल्ह्याचे, राज्याचे आणि चॅम्पियन्स कराटे क्लब, रायगडचे नाव उंचावले आहे. या सर्व खेळाडूंच्या यशामागे प्रशिक्षक अविनाश मोरे, प्रसाद विचारे आणि रितेश मुरकर यांची मेहनत आणि योग्य मार्गदर्शन आहे.

काठमांडू कराटे स्पर्धेत मार्शल अकॅडमीचे यश

। नागोठणे । वार्ताहर ।

काठमांडू येथे आंतरराष्ट्रीय कराटे अजिंक्यपद स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेत मार्शल आर्टस् स्पोर्ट्स अकॅडमी रायगडच्या खेळाडूंनी द्वितीय विजेतेपद मिळविले. सर्व खेळाडूंना प्रशिक्षित मास्टर कल्पेश शिंदे यांचे मार्गदर्शन मिळाले. या स्पर्धेत २१ मुलांनी ६ सुवर्ण पदक, ६ रौप्य पदक व ९ कांस्य पदकांची कमाई कमाई करून रायगड जिल्ह्याचे नाव आपल्या देशातील क्रीडा क्षेत्रात उंचवले आहे.

या स्पर्धेत रया मोहन पाटील-सार्थक सावंत, पार्थ सावंत, स्वरूप पवार, सनया निगुडसे, भूमी भोईर या सहा खेळाडूंनी सुवर्ण पदकाची कमाई केली. दिया म्हात्रे, सानिया वझरकर, दुर्वा म्हात्रे, स्मित कामतेकर, आशाकं पाटील, समर कांबळे यांनी रौप्यपदक मिळविले तर आर्या दपके, सेजल म्हात्रे,सानिया जाधव, आराध्य पाठणकर, हर्ष ठाकूर, मनीष म्हात्रे, प्रथमेश म्हात्रे, करण जाधव, आयुष म्हात्रे या खेळाडूंनी कांस्यपदके मिळविली.

सचिन बनला हसमुख दूत

। मुंबई । प्रतिनिधी ।

मास्टर ब्लास्टर क्रिकेटपटू, भारतरत्न सचिन तेंडुलकर आता राज्य शासनाच्या 'स्वच्छ मुख अभियाना'चे ब्रँड ॲम्बेसेडर असणार आहेत. राज्य शासनाच्याकडून राबवल्या जाणाऱ्या या अभियानासाठी हसरा राजदूत म्हणून लोकांमध्ये जनजागृतीची करण्याची महत्त्वाची जबाबदारी पार पाडण्यासाठी सचिन तेंडुलकर यांनी तयारी दाखवली आहे.

याबाबतचा सामंजस्य करार करण्यात आला. वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीष महाजन यांनी याबाबतची माहिती दिली आहे. सचिन तेंडुलकर हे या अभियानाचे 'स्माइल ॲम्बेसेडर' म्हणून पुढील पाच वर्षे कार्य करणार आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीष महाजन, सचिन तेंडुलकर यांच्यासह अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. सचिन तेंडुलकर यांनी या अभियानाचे सदिच्छादूत पद स्वीकारल्यामुळे या अभियानाची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर पसरुन चांगला प्रतिसाद मिळेल, असा विश्वासही यावेळी मंत्री महाजन, देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. वाढत्या मौखिक आजारांवर नियंत्रण आणण्यासाठी राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत शिफारस करण्यात आलेल्या आणि जागतिक आरोग्य संघटनेने नमूद केलेल्या मौखिक आरोग्याबाबत कृती योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने या वर्षापासून 'महाराष्ट्र मौखिक आरोग्य अभियान' म्हणजेच 'स्वच्छ मुख अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

उन्हाळी सुट्टीत पोहण्याचा आनंद

। खांब-रोहा । वार्ताहर ।

दिवसेंदिवस वाढत जाणारी उष्णता यामुळे सुट्टीचा उपभोग घेता यावा यासाठी बच्चे कंपनी व तरूणाई देखील पोहण्याचा आनंद लुटत असताना दिसत आहेत. रोहे तालुक्यात विविध ठिकाणच्या तलाव,विहिरी,नदी किनारी आबालवृद्ध पोहण्याच आनंद घेताना दिसत आहेत.

दरवर्षी मे महिन्याची सुट्टी म्हणजे मौजमजेचे सुट्टी ठरते.सुट्टीत विविध बेत आखले जातात. मे महिन्याची सुट्टी आणि मामाचे गाव यांचे तर पुर्वापार ऋणानुबंधनाचे नाते.त्यामुळे सर्रास मुले सुट्टीत मामाच्या गावाला जातात किंवा अन्य नातेवाईक यांच्याकडे जातात.तर काहीजण कुटूंबासोबत दूरच्या प्रवासाला जाऊन सुट्टीचा मनमुरादपणे आनंद लुटतात.तर बहुतांश मुले ही नदी, नाले,कालवे,तलाव यामध्ये मनमुरादपणे पोहण्याचा आनंद घेताना दिसत आहेत. तसेच विविध बैठे खेळ,सांघिक खेळ खेळणे,टिव्हीवर आवडत्या मालिका पाहणे,मोबाईलवर गेम्स खेळणे आदी मनोरंजनाचे साधनातून विरंगुळा मिळवित आहेत.तर सध्या वाढत जाणारी काहिली व यामुळे शरीराला होणारा यापासून बचाव करण्यासाठी व पोहण्याचा आनंद लुटण्यासाठी बच्चे कंपनीसह व तरूणाई तसेच जेष्ठ मंडळीही पोहण्याचा आनंद लुटताना दिसत आहेत.

कडक उन्हात सावलीचा आधार

वैशाख वणण्याचा चटका वाढतच चालला आहे.अशावेळी सर्वांनाच सावलीचा आधार घ्यावासा वाटतो.रस्त्यावरुन मोकाटपणे चालणाऱ्या या जनावरांनीही सुकलेल्या झाडाच्या सावलीचा आधार घेतला. (छायाचित्र : राजेश डांगळे)

उरणची लक्ष्मी शर्मा मिसेस एशियाची मानकरी

। उरण । वार्ताहर ।

उरणमधील लक्ष्मी शर्मा हिने लंडनमध्ये पार पडलेल्या मिसेस एशिया ग्रेट ब्रिटन-२०२३ च्या सौंदर्य स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे स्थान पटकावले आहे. या सौंदर्य स्पर्धेतील यशाबद्दल तिचे उरण तालुक्यातून अभिनंदन करण्यात येत आहे.

उरण येथे वास्तव्य व उच्च शिक्षण घेतलेल्या लक्ष्मी शर्मा लंडनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या मिसेस एशिया ग्रेट ब्रिटन-२०२३ च्या स्पर्धेत सहभागी झाली होती.या स्पर्धेत तिने अंतिम फेरीत धडकही मारली होती. लंडन येथे या स्पर्धेची अंतिम फेरी पार पडली.या अंतिम फेरीत लक्ष्मी शर्मा द्वितीय क्रमांकाची मानकरी ठरली. तिच्या या यशाने उरणकरांच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. तिच्या या यशाबद्दल आई-वडिल, निकटवर्तीय शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते काका पाटील आणि विविध स्तरांवरुन शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

कबड्डी स्पर्धेत गणेश क्लब विजेता

लाल बावटा चषक स्पर्धेला प्रतिसाद

। उरण । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील नवीन शेवा गाव येथे शेकापचे उरण विधानसभा अध्यक्ष मयुर सुतार यांनी मयुर मित्र मंडळ उरण संघटना व शेकाप यांच्या संयुक्त विद्यमाने कबड्डी स्पर्धा,अंडर आर्म क्रिकेट, आणि हॉलिबॉल या नाईट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन द्रोणागिरी स्पोर्टचे अध्यक्ष महादेव घरत,अंडर आर्मचे उदघाटन राजेंद्र पाटील यांच्या शुभहस्ते झाले.यावेळी रायगडभूषण प्रा.

॥ क्रिकेट स्पर्धेत कोटनाका विजयी

॥ मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण

एल.बी.पाटील,काका पाटील, युवानेते रमाकांत म्हात्रे, यशवंत ठाकूर,तालुका चिटणीस विकास नाईक,महादेव बंडा,किसन सुतार,बाळकृष्ण पाटील, वासुदेव म्हात्रे,स.ही.पाटील, भारत पाटील, सचिन पाटील, स्वप्नील पाटील, निरंतन पाटील,मयूर म्हात्रे, राकेश भोईर,ग्रामपंचायत सदस्या भावना भोईर,रेखा म्हात्रे,महेश म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. खेळाडूंनी आपल्या खेळाने प्रेक्षकांना प्रभावित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाम ठाकूर व लक्ष्मण म्हात्रे यांनी सुरेख केले.

कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक गणेश क्लब बोकडविरा, द्वितीय क्रमांक बोरी, तृतीय पनवेल चौथा क्रमांक भेंडखळ यांनी पटकाविले

क्रिकेट स्पर्धेत प्रथम क्रमांक कोटनाका, द्वितीय के के करंजा, तृतीय क्रमांक आर डी कोळीवाडा, चौथा क्रमांक बोकडविरा संघाने पटकविला. या स्पर्धेला उत्तम प्रतिसाद मिळाल्याने पुढील वर्षी या स्पर्धा जिल्हा स्तरीय स्वरूपात घेणार असल्याचे मयूर सुतार यांनी सांगितले.

मयूर सुतार मित्र मंडळ ही संघटना जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी तरुणांना नोकरी मिळवून देण्यासाठी, खेळांमध्ये तरुणांना प्रोत्साहन देण्यासाठी स्थापन केल्याचे सांगत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेणाऱ्या सर्वांचे मयूर सुतार यांनी आभार मानले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)